## अंतरंग

करंजाडे येथे विविध विकासकामांचे उद्घाटन/३

प्रियकराच्या मदतीने काढला पतीचा काटा/५

रायगडच्या तायक्कांदोपटूंची भारतीय संघात निवड/८



रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ७

www.ramprahar.com

सोमवार, २४ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



**पाहिजेत**

**श्री धूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित, आरोग्यमंदिर, आयुर्वेद चिकित्सालय व पंचकर्म केंद्र, पनवेल,** येथे **पुरुष मसाज थेरपिस्ट**, ह्या पदासाठी, पूर्णवेळ, कायम तत्त्वावर, जागा भरणे आहे. पंचकर्म थेरपिस्ट विषयातील प्रमाणपत्र किंवा/आणि किमान एक वर्षाचा पंचकर्म केंद्रात काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तरीही इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून एका आठवड्याच्या आत संस्थेशी संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक : (०२२) ६२३४६४५१/५२/५३


# इर्शाळवाडीतील शोधमोहीम थांबवली

## ५७ जण बेपत्ता; पालकमंत्री उदय सामंत यांची माहिती

**खालापूर, चौक, खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

इर्शाळवाडीत दरड दुर्घटनेनंतर सुरू असलेली शोधमोहीम ग्रामस्थांच्या विनंतीनंतर थांबविण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी रविवारी (दि. २३) प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. या दुर्घटनेत २७ जणांचे मृतदेह हाती लागले असून ५७ जण बेपत्ता आहेत. या ठिकाणी पर्यटकांना बंदी घालत जमावबंदीचा आदेशही लागू करण्यात आला आहे.

पालकमंत्री उदय सामंत यांनी प्रशासनाशी चर्चा करीत इर्शाळवाडी दुर्घटनेतील शोधमोहीम थांबवल्याची माहिती देण्यासाठी खालापूर पोलीस ठाण्यात पत्रकार परिषद घेतली. स्थानिक आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे,



जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह अन्य अधिकारी सोबत होते.

या वेळी इर्शाळवाडीतील माहिती देताना पालकमंत्री सामंत म्हणाले की, या वाडीत ४३ कुटुंबं वास्तव्यास होती. यापैकी ५७ जण बेपत्ता असून २७ मृतदेह सापडले आहेत. दोन कुटुंब पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. एनडीआरएफच्या पथकाला शनिवारी छिन्नविच्छिन्न अवस्थेत मृतदेह सापडल्याने शोधकार्य थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बचावलेल्या १४१ लोकांचे तात्पुरते पुनर्वसन चौक येथे कंटेनरमध्ये करण्यात येत आहे. त्यांना सिडकोच्या माध्यमातून घरे बांधून देण्यात येतील. पालकमंत्र्यांनी शोधमोहिमेत सहकार्य करणाऱ्या सामाजिक संघटनांचे आभार मानले.

### परिसरात जमावबंदी

इर्शाळगड परिसरात कलम १४४ अंतर्गत बंदी घालण्यात आली असून हा परिसर संरक्षित जाळी लावून बंद करण्यात येणार आहे. पर्यटकांनी या ठिकाणी येण्याचा प्रयत्न करू नये यासाठी पोलीसदेखील तैनात करण्यात येणार आहेत. प्रसारमाध्यमांतूनही याबाबत पर्यटकांमध्ये जागृती करावी, असे आवाहन पालकमंत्री उदय उदय सामंत यांनी या वेळी केले.

# पिकांच्या नुकसानीवरही राज्य सरकारचे लक्ष

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या विविध भागांमध्ये सातत्याने अतिवृष्टी सुरू आहे. अशा परिस्थितीत एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि स्थानिक प्रशासन काम करीत आहे. पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीवरही सरकारचे लक्ष आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते रविवारी (दि. २३) प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

राज्यात काही ठिकाणी १५ दिवसांत किंवा एका महिन्यात जितका पाऊस आला पाहिजे तितका पाऊस दोन ते तीन दिवसांत पडत आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा तेवढा निचरा होत नाही आणि पाणी जमा होते. त्यातून बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागत आहे. आपण सगळीकडे अलर्ट दिले आहेत. जिथे अतिवृष्टी होणार आहे तिथे उपाययोजना केल्या जात आहेत. एसडीआरएफ किंवा एनडीआरएफ आवश्यकतेनुसार वेळेत पोहचत आहे. बचावकार्य सुरू आहे. अतिवृष्टीचा अंदाज आला, तरी तो किती मोठ्या प्रमाणात आहे याचा तंतोतंत अंदाज येणे कठीण असते. अनेकदा अपेक्षापेक्षा अधिक पाऊस पडलेला पाहायला मिळतो, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आमदारांच्या निधी वितरणाच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केवळ त्यांच्याबरोबर आलेल्या आमदारांनाच निधी दिलेला नाही, तर भाजप-शिवसेनेच्या व इतरही काही आमदारांनाही निधी दिला आहे.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंकडून दुर्घटनाग्रस्तांचे सांत्वन



**चौक : प्रतिनिधी**

केंद्रीय राज्यमंत्री आणि रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी रविवारी (दि. २३) खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी दुर्घटनाग्रस्तांची नढाळ येथील निवारा केंद्रात भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले. त्याचप्रमाणे बेस कॅम्पवर जाऊन पाहणी केली. या वेळी त्यांनी दुर्घटनाग्रस्तांसाठी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली.

ना. रामदास आठवले यांच्यासमवेत रिपाइंचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, खालापूर तालुका अध्यक्ष अध्यक्ष महेंद्र धनगावकर, समन्वयक धर्मानंद गायकवाड व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी ना. आठवले यांनी, या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करणार असून वनखात्याच्या कायद्यात सुधारणा करणे, दऱ्याखोऱ्यातील लोकांना व मुंबई येथेही अशा काही जागा आहेत त्यांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी केंद्र व राज्य मिळून काम केले जाईल, असे सांगितले. आदिवासी विकास मंत्रालयाच्या संबंधित मंत्री आणि प्रशासन यांच्याशीही याबाबत बोलणी करणार असल्याचेही त्यांनी म्हटले.

# ग्रामस्थांना अत्यावश्यक दाखल्यांचे वाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीचे तातडीने पुनर्वसन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली असून पावसाची पर्वा न करता दुर्घटनाग्रस्त ग्रामस्थांना दिलासा देण्याचे काम सुरू आहे. या सर्व कुटुंबांना अत्यावश्यक दाखले उपलब्ध करून देण्यासाठी शनिवार (दि. २२)पासून तात्पुरते निवारा केंद्र येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

इर्शाळवाडी ग्रामस्थांच्या अस्तित्वाचा शासकीय पुरावा नष्ट झाला आहे. केवळ नाव हीच त्यांची ओळख शिल्लक राहिली. या सर्व नागरिकांना तातडीने अत्यावश्यक दाखले वितरण करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी घेतला. त्यानुसार निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी संबंधित तालुक्यातील अधिकाऱ्यांची या कामासाठी नेमणूक केली. (पान २ वर..)

### रायगडसह कोकणाला पुन्हा अतिवृष्टीचा इशारा

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाने दमदार हजेरी लावली आहे, तर काही भागांत अतिवृष्टी झाली आहे. अशातच आता पुन्हा एकदा कोकणातील रायगडसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना पुढील पाच दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, तर विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

## निवडक

### चिराग-सात्विक जोडीला कोरिया ओपनचे विजेतेपद



**येओसू :** सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी या भारतीय पुरुष जोडीने बीडब्ल्यूएफ ५०० टूर्नामेंट कोरिया ओपनचे विजेतेपद पटकावले आहे. त्यांनी रविवारी (दि. २३) इंडोनेशियाच्या फजर ॲलन आणि मोहम्मद रियान या जगातील नंबर वन जोडीचा १७-२१, २१-१३, २१-१४ पराभव केला.

### लातूरमध्ये दहशत माजवणाऱ्या मनोरुग्णाला अखेर पकडले

**लातूर :** हातात कोयता घेऊन दहशत माजवणाऱ्या एका मनोरुग्णाला रविवारी (दि. २३) दोन तरुणांनी धाडस दाखवत पकडले. या मनोरुग्णाने आधी तिघांवर हल्ला करून गंभीर जखमी केले. जवळपास २५ पोलीस पाच तासांपासून या मनोरुग्णाला पकडण्याचा प्रयत्न करीत होते, पण तो त्यांच्या अंगावर धावून जात होता. या घटनेचा धक्कादायक व्हिडीओ समोर आला आहे.






**पनवेल : भारतीय जनता पक्ष पनवेल विधानसभा कार्यकर्ता मेळावा पक्षाचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झाला. या मेळाव्यास 'चाणक्य'चे संस्थापक राम भोजने, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, नितीन पाटील, रायगड लोकसभा विस्तारक सोपान जांबेकर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल व्यासपीठावर उपस्थित होते.**

# आदिवासींच्या सुरक्षिततेसाठी आमदार महेश बालदी दक्ष

## वाड्यांची पाहणी करून जाणून घेतल्या समस्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीत घडलेल्या दरड दुर्घटनेनंतर या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे कार्यतत्पर आमदार महेश बालदी सातत्याने घटनास्थळी असून आवश्यक ते सहकार्य करीत आहेत. दरम्यान, इतर आदिवासीवाड्यांमध्ये असा प्रकार घडू नये यासाठी त्यांनी आदिवासी समाजाचे नेते व यवतमाळमधील आमदार डॉ. संदीप धुर्वे यांच्यासमवेत पाहणी करून आढावा घेतला.

इर्शाळवाडीतील दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री, मंत्री, लोकप्रतिनिधी या भागाचा दौरा करीत आहेत. शासकीय यंत्रणा आणि सेवाभावी संघटना बचाव व मदतकार्य करीत आहेत. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आदिवासी समाजाचे यवतमाळमधील केळापूर मतदारसंघाचे आमदार शनिवारी (दि. २२) इर्शाळवाडीत पोहचले. त्यांनी स्थानिक आमदार महेश बालदी यांच्याकडून परिस्थितीची माहिती घेतली. त्यानंतर बोरगाव, तारवाडी, चांगवाडी येथील आदिवासी वाड्यांमध्ये जाऊन तेथील जागेची पाहणी करण्यात आली. या वेळी आमदारांनी तिथे राहणाऱ्या आदिवासी, ठाकूर समाजाच्या लोकांशी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या संदर्भात आमदार महेश बालदी यांनी सध्या मुंबईत सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनातही शासनाचे लक्ष वेधले आहे.

इर्शाळवाडीतील दरडग्रस्तांना सध्या राहण्यासाठी केलेल्या जागेची पाहणी करून त्यांना काही कमी नाही पडणार याकडे आम्ही लक्ष घातले. दरडग्रस्त कुटूंबांना आधार दिल्यामुळे तेथील सर्व रहिवाशांनीदेखील आपली घरे सोडून सुरक्षितस्थळी येण्यासाठी संमती दर्शविलेली आहे, असे आमदार महेश बालदी म्हणाले.

या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, सरचिटणीस प्रवीण मोरे, तुपगाव ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, बोरगाव ग्रामपंचायतीचे सरपंच प्रितेश मोरे, चौक ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गणेश कदम, युवा उद्योजक सागर देशमुख, सागर ओसवाल, प्रकाश घोगरे, नंदकुमार सोनवणे, विजय ठोसर, गणेश मुकादम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दरडप्रवण भागाचा आढावा

सतत पडणाऱ्या पावसामुळे काही डोंगरांना भेगा पडलेल्या आहेत, तर काही ठिकाणी मोठे दगड पडण्याची भीती आहे. अशा सर्व जागांची पाहणी करून तेथील आदिवासी बंधू-भगिनींना विश्वासात घेऊन त्यांच्या सुरक्षिततेसाठी सरकारच्या माध्यमातून जे जे करणे शक्य आहे ते सर्व केले जाईल तसेच सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणा तयार आहेत. फक्त आपली मानसिकता आणि तयारी दाखवा. आपले जीवन व कुटुंब आमच्यासाठी मौल्यवान आहे, अशा शब्दांमध्ये सर्वांना विनंती करून सर्वांना सुरक्षितस्थळी आणण्याचे काम येत्या काही दिवसांतच करण्यात येईल, असे आमदार महेश बालदी यांनी या वेळी सांगितले.



# माथेरानमध्ये सर्वाधिक पावसाची नोंद

## तीन हजार मिलीमीटर पर्जन्यमानाचा टप्पा पार

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान या जागतिक पर्यटनस्थळाने शनिवारी (दि. २२) तीन हजार मिलीमीटर पर्जन्यमानाचा टप्पा पार केला आहे. पर्जन्य नोंदीनुसार माथेरानमध्ये एकूण ३१०९.६० मिमी इतका पाऊस पडला आहे.

गेल्या वर्षीच्या पर्जन्यनोंदीचा तुलनात्मक योगायोग म्हणजे याच दिवशी म्हणजे २२ जुलै रोजी माथेरानने तीन हजार मिमी पावसाचा टप्पा पार झाला होता. गतवर्षी याच दिवशी ३०१२.८० मिमी इतके पर्जन्यमान नोंद झाले होते.

माथेरानला यंदाची एका दिवसाची म्हणजेच २४ तासांतील सर्वाधिक पर्जन्यनोंद ३९८ मिमी इतकी २० जुलैला नोंद झाली होती. त्याआधी १९ जुलैलासुद्धा ३४२.६ मिमी इतका प्रचंड पाऊस झाला. म्हणजेच या सलग दोन दिवसांत माथेरानमध्ये तब्बल ७४०.२० मिमी इतकी अतिवृष्टी झाली.



चालू वर्षीच्या पावसाला ४ जून रोजी १.२ मिमीने माथेरानला सुरुवात होऊन ३० जून अखेरीस महिनाभराची एकूण पर्जन्यनोंद ६९८.२ मिमी इतकी होती. त्यानंतर एक हजार मिमीचा टप्पा ३ जुलै रोजी (एकूण १०२४.० मिमी), दोन हजार मिमीचा टप्पा १९ जुलैला (एकूण २३११.४० मिमी), तर त्यानंतरच्या अवघ्या तीन दिवसांत दोन हजार ते तीन हजारपर्यंतचा पर्जन्यमानाचा टप्पा २२ तारखेला पार झाला आहे.

माथेरानमध्ये संपूर्ण जून महिन्यात एकूण ६९८.२ मिमी, तर जुलै महिन्यात २२ तारखेपर्यंत एकूण २४११.४० मिमी इतके पर्जन्यमान झाले आहे. दोन्ही पर्जन्यनोंदी मिळून माथेरानला या पावसाळ्यात २२ जुलैपर्यंत एकूण ३१०९.६० मिमी म्हणजेच १२२.४ इंच पर्जन्य नोंदला गेला आहे. गेल्या वर्षी संपूर्ण पावसाळ्यात २१९.१ इंच इतकी पर्जन्यनोंद झाली होती. म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी आतापर्यंत ५६ टक्के पाऊस माथेरानला पडलेला आहे, अशी माहिती येथील पर्जन्यमान निरीक्षक अन्सार महापुळे यांनी दिली.

# पनवेलमध्ये धबधब्यावरून पडून तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

धबधब्यावरून पाय घसरून वर्षासहलीसाठी गेलेल्या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २३) पनवेल तालुक्यातील पडघे कोळवाडीजवळील फणसवाडी येथे घडली. राणाप्रताप राम असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे.

मूळचे उत्तर प्रदेश गाजीपूरचे आणि तळोजा येथे राहणारे तीन तरुण पाले बुद्रुक ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील फणसवाडी येथील धबधब्यावर मौजमजा करण्यासाठी गेले होते. यातील राणाप्रताप राम हा धबधब्यावरून पाय घसरून पडला. डोक्याला मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. मृत झालेल्या तरुणासोबत गुलशन संजय रामकुमार, सुरज कैलास रामकुमार होते.

फणसवाडी येथील जगन भगत यांनी ही घटना पनवेल पोलिसांना दिली. पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन स्थानिकांच्या मदतीने मृतदेह डोंगरातील अवघड जागेतून गावाच्या ठिकाणी आणला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# इर्शाळवाडीच्या पुनर्वसनासाठी प्रशासन सज्ज

## शासकीय विभाग, अधिकाऱ्यांवर जबाबदारी; जिल्हा प्रशासनाचे निर्देश

**अलिबाग : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे दरड कोसळून नैसर्गिक आपत्तीचे संकट ओढावले आहे. त्या अनुषंगाने मदत व बचावकार्य करून आपदग्रस्तांचे तात्पुरते तसेच कायम पुनर्वसनासाठी विविध शासकीय विभाग आणि अधिकाऱ्यांना जबाबदारी देण्यात येत असल्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.




पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांनी आपदग्रस्तांच्या मदत व पुनर्वसनाकामी आवश्यक यंत्र सामुग्री तसेच मनुष्यबळ पनवेल व नवी मुंबई महापालिकेकडून उपलब्ध करून घेणे; जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशेट्टी, यांना आपदग्रस्तांच्या मदत व पुनर्वसनाकामी आवश्यक यंत्रसामुग्री तसेच मनुष्यबळ पेण, अलिबाग, खोपोली, खालापूर व कर्जत नगरपरिषदांकडून उपलब्ध करून घेणे; पेण उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार आपदग्रस्तांना देणेकामी संसार उपयोगी साहित्य उपलब्ध करून घेणे, साहित्य दिलेल्या कंटेनरमध्ये व्यवस्थितरित्या साठवून ठेवणे, या साहित्याचे सूचनांप्रमाणे कुटुंबनिहाय वाटप करणे, आवक व जावक हिशोब ठेवणे व तो वेळोवेळी जिल्हाधिकारी यांना सादर करणे; उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र.१ पनवेल दत्तात्रेय नवले यांना नानीवली येथे बेस कॅम्पवर उपस्थित रहाणे, दुर्घटनास्थळी येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती तसेच वरिष्ठ अधिकारी यांच्या संपर्कात राहून दुर्घटना तसेच बचावकार्याबाबत सविस्तर माहिती देणे; कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नेराळे, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांना इर्शाळवाडी येथील बचावकार्याचे नियंत्रण करणे, माहिती वेळोवेळी नियंत्रण कक्षास देणे, विविध नोडल अधिकारी यांच्याशी समन्वय साधणे, आपदग्रस्तांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाकामी सुयोग्य जागेची निवड करून जागा मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे, पुनर्वसित वसाहतीच्या उभारणीचे कामकाज सुरू झाल्यानंतर त्यांचे प्रगतीवर लक्ष ठेवणे व त्याबाबतचा साप्ताहिक प्रगती अहवाल आठवड्याच्या सोमवारी जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांना सादर करणे अशी जबाबदारी देण्यात आली आहे.

रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी तात्पुरत्या निवाऱ्यासाठी सुयोग्य जागा निश्चित करणे, जेएसडब्ल्यू, जेएनपीटी व जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधून कंटेनर उपलब्ध करुन घेणे, या कंटेनरमध्ये निवासाच्या अनुषंगाने वैद्यकीय, पाणीपुरवठा तसेच रस्त्याची व्यवस्था करणे, कुटुंब संख्येनुसार संबंधिताना तात्पुरत्या निवाऱ्याकामी कंटेनरचे वाटप करणे, एमएसईडीसीएलच्या मदतीने वीजपुरवठा उपलब्ध करून घेणे, केलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी तसेच नियंत्रण कक्षास अवगत करणे पनवेल अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधीकरणच्या अर्चना प्रधान यांना खालापूर तहसीलदार कार्यालय या ठिकाणी नियंत्रण कक्षात उपस्थित राहणे, दुर्घटनेच्या अनुषंगाने मदत व पुनर्वसन कार्यावर लक्ष ठेवणे, विविध नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून विविध अहवाल वेळोवेळी शासन तसेच जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे, आपदग्रस्तांना स्वत:चे स्वतंत्र नवीन घर मिळेपर्यंत सदर तात्पुरत्या पुनर्वसन केंद्राचे पालक अधिकारी म्हणून काम करणे; खालापूर अपर तहसीलदार पूनम कदम व वावोशी मंडळ अधिकारी तुषार कामत यांना आपदग्रस्तांना विविध शासकीय निधी मिळवून देण्याकामी तालुकास्तरावरील विविध अहवाल दाखले तसेच आपदप्रस्तांची वैयक्तिक माहिती शासन तसेच जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे, आपदग्रस्तांचे खराब व नष्ट झालेली कागदपत्रे व दाखले पुनर्जिवीत करण्याकामी विशेष कॅम्पचे आयोजन करुन त्यांना सदर दाखले व कागदपत्रे नव्याने उपलब्ध करून देणे अशी जबाबदारी आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांना इर्शाळवाडी येथील मदतकार्यासाठी बाहेरून आलेल्या कर्मचारी, स्वंयसेवक व आपदग्रस्त नागरिकांच्या चहा, नाष्टा व जेवणाची व्यवस्था करणे, आपदग्रस्तांना कुटुंबनिहाय स्वतंत्र शिधापत्रिका द्यावी, कुटुंबनिहाय स्वतंत्र गॅस कनेक्शन व शेगडी उपलब्ध करून देणे, शासन निर्णयाप्रमाणे अनुज्ञेय असलेले मोफत धान्य व केरोसीन उपलब्ध करून देणे; जिल्हा शल्यचिकित्सक अंबादास देवमाने यांना मृत व जखमी व्यक्तींचा अहवाल दर तीन तासांनी जिल्हा प्रशासनास सादर करणे, जखमी व्यक्तीच्या औषधोपचाराची व्यवस्था करणे; जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांना मृत व्यक्तीचे शवविच्छेदन करून त्याचा अहवाल व पंचनामा जिल्हा प्रशासनास सादर करणे अशी जबाबदारी आहे.

जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांना घटनास्थळी बेस्ट कॅम्प आणि निवारे केंद्र येथे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे,चौक या ठिकाणी करण्यात आलेल्या तात्पुरत्या पुनर्वसनाच्या ठिकाणी आपदग्रस्तांना पिण्याचे शुद्ध पाणी तसेच वापरासाठी मुबलक देणेकामी साठवण टाकी व पाईपलाईन तसेच अनुषंगिक व्यवस्था करणे, त्याची वेळोवेळी देखभाल करणे, केलेल्या कार्यवाहीबद्दल या ठिकाणचे नोडल अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांना केलेल्या कार्यवाहीबद्दल अहवाल सादर करणे; सार्वजनिक बांधकाम इलेक्ट्रिक विभाग पेणच्या कार्यकारी अभियंता संजीवनी कट्टी, घटनास्थळी विद्युत वितरण व्यवस्था पुर्ववत करणे, विद्युत व्यवस्थेच्या पर्यायी व्यवस्थेच्या अनुषंगाने कार्य करणे, तात्पुरत्या पुनर्वसनाच्या ठिकाणी कुटुंबनिहाय वीजजोडणी उपलब्ध करून देऊन पुनर्वसीत नवीन घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ही वीजजोडणी आपदग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या घरांना स्थलांतरित करणे; पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. रत्नाकर काळे यांना मृत जनावरांचे पंचनामे व जखमी जनावरांच्या औषधी व्यवस्था करणे, मृत जनावरांचे शवविच्छेदन करून त्यांची विहित पद्धतीने विल्हेवाट लावणे व तद्अनुषंगिक कामे करणे, आपदग्रस्तांना उदरनिर्वाहासाठी शासकीय योजनेतून जनावरे व गोठे तसेच तद्रुषंगीक साहित्य उपलब्ध करून देणे, इर्शाळवाडी येथील मोकाट जनावरे व कुत्रे यांना ताब्यात घेऊन त्यांना सुयोग्य ठिकाणी पोहचविणे, विविध नोडल अधिकारी तसेच नियंत्रण कक्षाशी संर्पकात राहून मदत व बचावकार्य, शासकीय मदत वाटप करणे ही जबाबदारी आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग कोकण भवन अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड यांना पुनर्वसनाकामी गृहबांधणी व विविध नागरी सुविधांची उभारणीकामी तयारी करणे, या विकसनाचे आराखडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर करुन घेणे, आपदग्रस्तांचे वसाहतीच्या उभारणीचे कामकाज सुरू झाल्यानंतर कामाची प्रगती व गुणवत्ता यावर लक्ष ठेवणे, या वसाहतीच्या विकासाच्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवणे, वसाहत उभारणे कामकाज पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे, पूर्ण झालेल्या घरांचे विहीत पद्धतीने आपदग्रस्तांना वाटप करणे. नमूद अधिकारी यांनी तात्काळ आपल्या अधिनस्त अधिकारी, कर्मचाऱ्यांसह आपल्याला नेमून दिलेल्या कर्तव्याच्या ठिकाणी हजर रहावे. आवश्यकतेनुसार मदतीसाठी आपले अधिनस्त अधिकारी कर्मचाऱ्यांचे आदेश निर्गमीत करावेत. ही बाब नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने असल्यामुळे प्रथम प्राधान्य देण्यांत येणार आहे.

समन्वयासाठी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के व उपजिल्हाधिकारी जीवन देसाई यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविले आहे.

## रायगड पोलिसांकडून माणुसकीचे दर्शन



**अलिबाग : प्रतिनिधी**

एरव्ही खाकी वर्दी पाहिली की अनेकांच्या माना फिरतात. आदिवासी समाज तर पोलिसांना दचकूनच असतो, परंतु दराडग्रस्त इर्शाळवाडीतील पीडितांसाठी रायगड पोलीस दोन दिवसांपासून पालकांची भूमिका बजावत आहेत.

इर्शाळवाडी येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्री व सर्व पक्षीय नेत्यांनी घटनास्थळी भेटी दिल्या. त्यासोबतच बघ्यांची गर्दी, मदतीचा ओघ अशा गर्दीचा चोख बंदोबस्त करता करता सलग दोन रात्रींचा जागता पहारा, इर्शाळवाडीपर्यंतचा दिवसांतून किमान दोन वेळा प्रवास अशी दगदग होत असतानाही दरड दुर्घटनेत जखमी झालेले, बेघर झालेले, जवळच्या नातेवाईकांना गमावल्याच्या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या पीडितांची काळजी पोलीस अधिकारी व कर्मचारी घेत आहेत. महिला पोलीस अधिकारी सरिता मनवर, पोलीस अधिकारी ज्ञानेश्वर फडतरे हे स्वतः जातीने या सर्व व्यवस्थेवर लक्ष ठेवून आहेत.

तात्पुरत्या निवारा शेडमध्ये असलेल्या दरडग्रस्तांना काही कमी तर पडत नाही ना यासाठी दिवसांतून दोनदा आस्थेवाईक पणे चौकशी करून कमी पडत असेल ते पुरविण्याचे काम पोलीस करत आहेत. इतकेच नाही तर महिला अधिकारी आपला अधिकचा वेळ महिला आणि लहान मुलांना देत त्यांना या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पीडित महिला आणि मुलांची व्यवस्था नानिवली अंगणवाडीत करण्यात आली आहे, तर पुरुषांची व्यवस्था प्राथमिक शाळेत करण्यात आली आहे.

## विद्यापीठ परीक्षा विभागाचा भोंगळ कारभार

**मुंबई :** महाडमधील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षा सुरू असून परीक्षा आयोजनामध्ये अनेक त्रुटी आढळल्या आहेत. याचा नाहक त्रास विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. विद्यापीठ प्रशासन परीक्षा आयोजनात वारंवार चुका करून हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहे, असा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केला आहे. याबाबतचे प्रसिद्धीपत्रक 'अभाविप'चे प्रदेश कार्यालय मंत्री ओजस जयवंत यांनी मुंबई येथून प्रसिद्धीस दिले आहे.

अमित ढोमसे म्हणाले की, विद्यापीठाच्या व्यवस्थापनशून्य परीक्षा आयोजनामुळे विद्यापीठाचे नाव बदनाम होत असून विद्यापीठ प्रशासनाने हा अनागोंदी कारभार तत्काळ बंद करावा. परीक्षा आयोजनामध्ये घडलेल्या गैरप्रकारांबाबत चौकशी करून कठोर कारवाई करावी.

# आमदार रविशेठ पाटील यांची पेणमधील पूरग्रस्त गावांना भेट

### पंचनामे करून भरपाई देण्याच्या सूचना

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यात गेली दोन-तीन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अनेकांची दाणादाण उडवली असून तालुक्यातील बाळगंगा, पाताळगंगा आणि भोगावती या तिन्ही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडून अनेकांच्या घरांचे नुकसान केले त्याचबरोबर शेतीची ही अपरिमित हानी झाली. या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत आणि नुकसान भरपाई द्यावी अशा सूचना पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांनी केली आहे.

अतिवृष्टीमुळे खरोशी कळवे, जोहे, हमरापूर, दुरशेत,कांदळे सोनखार, जिते, दादर,तांबडशेत आदीसह अनेक गावांमध्ये भातशेती व घरांचे नुकसान झाले आहे. आमदार रविशेठ पाटील यांनी रविवारी(दि. २३) या गावांना भेट देऊन तेथील ग्रामस्थांची विचारपूस केली आणि नुकसानीची पाहणी केली.

खरोशी येथे आमदार रविंद्र पाटील यांनी पाहणी केली त्यावेळी घरांमध्ये झालेले नुकसान, शेतीची झालेली अपरिमित हानी त्याचबरोबर अनेकांच्या घरात घुसलेले पाणी या सर्वांची योग्य ती चौकशी करून तत्काळ पंचनामे करण्यास सांगितले. दुरशेत गावातील ५४ घरंवर दरड कोसळण्याची भीती आहे. त्यामुळे तेथील नागरिकांचा जीव टांगणीला लागला आहे. गावाशेजारी असलेली वनखात्याची जागा आहे. गावठाण वाढवून तेथे गावाची व्यवस्था करावी अशी मागणी सरपंच दशरथ गावंड यांनी या वेळी केली.

आमदार रविशेठ पाटील यांनी मंडळ अधिकाऱ्यांना तसा प्रस्ताव पाठविण्याची सूचना केली.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य डी. बी. पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, खरोशी सरपंच रुपाली महेश घरत, बळवली सरपंच संजय डंगर, उपसरपंच गणेश पाटील, दुरशेत सरपंच दशरथ गावंड, मंडळ अधिकारी सुरेश ठाकूर, आर. बी. पाटील आदी उपस्थित होते.



पान १ वरून

## ग्रामस्थांना अत्यावश्यक दाखल्यांचे वाटप

दिवसभरात विविध प्रकारचे कागदपत्रे व संजय गांधी योजनेतंर्गत अनाथ १६, विधवा पाच, श्रावणबाळ एक असे लाभ संबंधितांना देण्यात आले. त्याचप्रमाणे ४२ व्यक्तींना रेशन कार्ड व ५७ जणांना आधार कार्डचे वाटप करण्यात आले. याबरोबरच ४१ कुटुंबाना सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले. प्रत्येक कुटुंबास पाच हजार याप्रमाणे दोन लाख १५ हजार रुपयांचे वाटप तसेच जीवनावश्यक वस्तूंचेदेखील वाटप करण्यात आले. त्यामुळे जिल्हा प्रशासन आपल्या पाठीशी खंबीर असल्याची जाणीव या ग्रामस्थांना झाली आहे.






## लवजी स्टेशनजवळ पाठलाग करून दोन चोरांना पकडले

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लवजी व श्रीरामनगर येथील चार ते पाच दुकानात चोरी करून पलायन करणाऱ्या चोरांचा पाठलाग करून यातील दोघांना रंगेहाथ पकडण्यात ग्रामस्थ विवेक पाटील व वैभव पाटील यांना यश आले आहे. तीन जण पळून जाण्यात यशस्वी झाले.

पकडण्यात आलेल्या एकाकडे धारदार शस्त्र होते. विवेक पाटील व वैभव पाटील यांची झटापट झाली. अखेर त्या दोघांना पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही घटना रविवारी (दि. २३) पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास घडली.

श्रीरामनगर येथील विवेक पाटील यांच्या दुकानात या चोरांनी पिण्याच्या पाण्याच्या बॉटल घेतल्या होत्या. हे पाच चोर असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून आले. दिवसभर चोर त्याच परिसरात फिरत होते. त्यांनी पहाटेच्या सुमारास लवजी स्थानकासमोरील चार ते पाच दुकाने शटर तोडल्यानंतर ते श्रीरामनगर येथील विवेक पाटील यांच्या दुकानाचा शटर तोडत असताना, झालेल्या आवाजाने शेजारील दुकानदाराने याबाबतची मोबाईलवरून विवेक पाटील यांना माहिती दिली, मात्र विवेक पाटील येईपर्यंत चोर पळून जाऊ लागले. त्यांचा पाठलाग करण्यात आला, मात्र अंधाराचा फायदा घेत तीन जण पळून जाण्यात यशस्वी झाले, परंतु दोघेजण पाठलाग करून पकडण्यात आले. चोरांकडे धारदार शस्त्र होती मात्र त्यावरील मात करीत जीव धोक्यात घालून विवेक पाटील व त्यांचे चिरंजीव वैभव पाटील यांनी अखेर त्यांच्याशी झटापट करून त्या दोघांना पकडून रात्रगस्त घालणाऱ्या पोलिसांच्या ताब्यात त्यांना दिले आहे.

हे चोर बदलापूर, अंबरनाथ परिसरातील असल्याची माहिती मिळत आहे. मोबाईल दुकानातील किमती मोबाईल चोरी झाल्याचे समजते. मिळालेल्या दोघा चोरांची झाडाझडती केले असता, त्यांच्याकडे काही वस्तू व रोख रक्कम असा ३० हजारांचा ऐवज सापडल्याचे पोलीस उपनिरीक्षक सुधाकर लहाने यांनी याबाबत बोलताना सांगितले या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## प्रजापती समाज विकास मंडळातर्फे वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ या सामाजिक संस्थेच्या वतीने पनवेलमधील गरजू मुलांना व विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे मोफत वहीवाटप करण्यात आले. मोफत वह्या वाटपात मोठ्या संख्येने गरजू मुले व विद्यार्थी सहभागी झाले होते.



या वेळी विद्यार्थ्यांचे पालक व संस्थेचे पदाधिकारी व इतर मान्यवरांनीही उत्साहाने सहभाग घेतला. या वेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सी. पी. प्रजापती, राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस विनोदकुमार प्रजापती, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सर्वजित प्रजापती, सचिव रवींद्र प्रजापती, पनवेल अध्यक्ष राजेंद्र प्रजापती, पनवेल शहर युवक अध्यक्ष विशाल प्रजापती, लवकुमार प्रजापती, रोहित प्रजापती, रामजन्म प्रजापती, राकेश कुमार प्रजापती, राकेश कुमार प्रजापती, आर. प्रजापती, शैलेश प्रजापती व संजय प्रजापती आदी उपस्थित होते.

## संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळाच्या योजना लाभदायक

**अलिबाग :** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी राज्य व केंद्र शासनाकडून विविध कर्ज योजना राबविल्या जातात. जिल्हा कार्यालय रायगड यांच्यामार्फत सन २०२३-२४ वर्षाकरिता या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील इच्छुक अर्जदारांकडून कर्ज प्रस्ताव २८ जुलैपर्यंत मागविण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक

**पनवेल :** पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस आणि तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक झाली. या बैठकीदरम्यान पक्ष बांधणी, नवीन नियुक्ती, पक्ष संघटना वाढीसाठी सूचना इत्यादी विषयांवर चर्चा झाली.



याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तसेच प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस व पनवेल तालुका राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष मंगेश नेरूळकर आणि पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या अध्यक्षा प्रज्ञा चव्हाण यांच्या पुढाकाराने युट्यूब चॅनल आणि इन्टाग्राम अकाऊंटचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी कार्यकारी अध्यक्ष डॉ. शिवदास कांबळे, प्रदेश संघटक सचिव राजकुमार पाटील, माजी नगराध्यक्ष सुनील मोहोड, खांदा कॉलनी शहर अध्यक्ष सुनील नाईक, तालुकाध्यक्ष दर्शन ठाकूर, तालुका महिलाध्यक्ष अक्षरा भोईर, परशुराम सुरते, खारघर शहराध्यक्ष बळीराम नेटके, जिल्हा उपाध्यक्ष कासम मुलाणी, जिल्हा उपाध्यक्ष संजय ननावरे, जिल्हा उपाध्यक्ष अजिनाथ सावंत, जिल्हा सचिव कुंडलिक नेटके, कार्यकर्ते उपस्थित होते.

# करंजाडे येथे विविध विकासकामे

**पनवेल : प्रतिनिधी**

करंजाडे ग्रामपंचायत व भारतीय जनता पक्ष करंजाडे अंतर्गत विविध विकास कामांचा उद्घाटन सोहळा रविवारी (दि. २३) करंजाडे येथे झाला. या विकासकामांचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले.



## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन

करंजाडे ग्रामपंचायत व भारतीय जनता पक्ष करंजाडे अंतर्गत आयोजित विविध विकासकामांचा शुभारंभामध्ये करंजाडे ग्रामपंचायत अंतर्गत अॅब्युलन्स सुविधा, ओपन जीम सुविधा, शिवमंदीराकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण, शौचालय सुविधा, गावदेवी आदीवासीवाडी येथे नळ-पाणी कनेक्शन आणि बीज कनेक्शन सुविधा यांसारख्या सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी करंजाडेकरांशी संवाद साधला. या वेळी ते म्हणाले की, करंजाडेमधील रस्ते लवकरच गुळगुळीत व चांगले होतील. पाण्याचा प्रश्न ही सुटेल. तुमचे प्रश्न सोडवण्याची आमदार प्रशांत ठाकूर आणि माझी जबाबदारी आहे. ग्रामपंचायत निवडणुकीत भाजप तर्फे तुम्हाला दिलेली आश्वासन पूर्ण करण्याची आमची जवाबदारी आहे. त्यासाठी सरपंच मंगेश शेलार पाठपुरावा करीत आहेत. तांत्रिक अडचणी दूर करण्याची जबाबदारी संबंधित पूर्ण करत नसतील तर त्याचा जाब त्यांना विचारून तोपर्यंत टँकर देण्यास त्यांना भाग पाडले जाईल. रस्त्याचे टेंडर निघाले आहे. पाऊस थांबल्यावर ते काम सुरू होईल.

विकासकामांचा शुभारंभावेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, शहर अध्यक्ष मिरेन्द्र शहारे, माजी उपसरपंच गजानन पाटील, माजी सरपंच बळीराम म्हात्रे, राकेश गायकवाड, समीर केणी, वैशाली जगदाळे, विक्रम मोरे, विजय आंग्रे, बाळु फडके, बळीराम भोईर, सुनील भोईर, नाथा भाई भारवाड, करंजाडे ग्रामपंचायतीच्या सदस्य सुरज शेलाल, देवकु वाघे, बिपीन गायकवाड, नंदकुमार भोईर, भाजप कार्यकर्ता निलेश दराडे, प्रिती शहारे, अनिता भोईर, शिल्पा नागे, अतीश साबळे, प्रिया फडके, कल्पना गायकर, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





## निवडक

### साठलेल्या पाण्यात महिलेचा मृतदेह

**पनवेल :** तालुक्यातील कसळखंड येथे असलेल्या बसस्टॉपच्या पाठी मागील बाजूस पावसामुळे साठलेल्या पाण्यात एका महिलेचा मृतदेह आढळला परिसरात खळबळ उडाली असून तिच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत. महिलेचे अंदाजे वय (४० ते ४५ वर्ष), डोक्यावरील केस काळे असून तिच्या अंगात निळा टीशर्ट व त्याच्या आतमध्ये लाल काळे ठिपके असलेली मॅक्सी घातलेली आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाणे (०२२-२४७५२४४४) किंवा पोलीस निरीक्षक लाला लोणकर (८०८७२५७७११) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### काँग्रेस पक्ष कार्यालयात चोरी

**पनवेल :** शहरातील एका पक्ष कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर अज्ञात चोरट्यांनी चोरी करून आतील इन्व्हर्टरची बॅटरी, एलइडी टीव्ही व संगणकाचा डेकस्टॉप असा मिळून हजारो रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. शहरातील काँग्रेस भवन, नित्यानंद मार्ग या ठिकाणी असलेल्या पक्ष कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर अज्ञात चोरट्यांनी चोरी करून आतील इन्व्हर्टरची बॅटरी, एलइडी टीव्ही व संगणकाचा डेकस्टॉप असा मिळून जवळपास ३६,००० रुपये किमतीचा ऐवज दोन्ही दरवाज्याचे लॉक व कडी कोयंडा तोडून चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बेकायदा सिगारेट विक्री करणारा ताब्यात

**पनवेल :** बेकायदेशीर ईसिगारेट विक्रीसाठी बाळगल्याप्रकरणी दानिश अली साजिद अली शेख (वय ३०, रा. अय्यप्पा मंदिरजवळ, सेक्टर १३, नवीन पनवेल) याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. शिवा कॉम्प्लेक्स सेक्टर १२ नवीन पनवेल या ठिकाणी ई-सिगारेटच्या विक्रीसाठी एक व्यक्ती येणार असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली. त्यानुसार गणेश मार्केटसमोरील सार्वजनिक रस्त्यावर एक व्यक्ती तेथे आला. त्याच्याकडे एक पिशवी होती. पोलिसांनी त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव दानिश अली साजिद अली शेख, असे सांगितले. झडतीत त्याच्याकडे बेकायदेशीर ई-सिगारेट सापडले.

### ज्येष्ठ नागरिक अपघातात जखमी

**पनवेल :** पायी जाणाऱ्या ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला एका कारने धडक दिल्याने त्यांचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला आहे. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल केला. अवधूत नारायण जोशी हे सेक्टर ३६, कामोठे येथे राहत असून ते शीव-पनवेल महामार्गाने कामोठेकडून वाशीकडे जाणाऱ्या लेनने पायी चालत जात होते. टोलनाक्याजवळ कार (एमएच ४६ एयु ०१५६) वरील चालक राहुल मोरे याने त्याच्या ताब्यातील कार वेगाने चालवून जोशी यांना धडक मारली. यात त्यांच्या डोक्याला मार लागला असून उजवा पाय फ्रॅक्चर झाला आहे.



**पनवेल : भाजप युवा नेते महेश पाटील, दिनेश खानावकर व पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील यांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २मधील नावडे, पडघे, तोंडरे, नागझरी, डोंगऱ्याचा पाढा, देवीचा पाडा, पाले खुर्द या गावांत १२०० छत्र्यांचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी उलवे नोड येथे करण्यात आला. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचे पदग्रहण

## आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : वार्ताहर**

सामाजिक शैक्षणिक कार्यात सदैव आघाडीवर असणार्या रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचा पदग्रहण सोहळा नुकताच प्रमुख पाहुणे भावी प्रांतपाल शितल शहा आणि पनवेलचे भाग्यविधाते आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत काकाजीनी वाडी-पनवेल येथे मोठ्या जल्लोषात झाला. या नयनरम्य सोहळ्यास विविध रोटरी क्लबचे अध्यक्ष डिस्ट्रिक्ट ऑफीसर्स, समाजातील प्रतिष्ठित नागरिक आदींसह रोटेरियन्स, अॅन्स आणि रोटरॅक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोटरीच्या प्रथेप्रमाणे राष्ट्रगीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. माजी सचिव हितेश राजपुत यांनी गतवर्षात केलेल्या उल्लेखनीय कामकाजाचा लेखाजोखा मांडला. माजी अध्यक्ष कल्पेश परमार यांनी गतवर्षातील उल्लेखनीय घटना विषद केल्या. श्याम फडणवीस यांनी प्रांतपाल मंजू फडके यांचा संदेश वाचून दाखवला. नूतन अध्यक्ष डॉ. जय भंडारकर यांनी आपली सन २०२३-२०२४ ची नूतन कार्यकारिणी जाहीर केली. प्रमुख पाहुणे भावी प्रांतपाल शितल शहा आणि प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते 'रोटरी'ची पिन लावून नूतन कार्यकारिणीला सन्मानित केले.

या वेळी शुभदा भगत यांनी संपादित केलेल्या 'विश्वचक्र' या बुलेटिनचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. डॉक्टर दिन आणि सी.ए. दिनाचे औचित्य साधून सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या डॉक्टरांचा आणि वकिलांचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला. नूतन अध्यक्ष डॉ. जय भंडारकर यांनी पुढील वर्षात करावयाच्या उल्लेखनीय उपक्रमांचा थोडक्यात आढावा घेतला. सर्वांच्या सहकार्याने आपण नुतन वर्ष संस्मरणीय करूया, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात रोटरी क्लबच्या माध्यमातून होत असलेल्या प्रचंड कामाबद्दल समाधान व्यक्त करून मला रोटेरियन असल्याचा विशेष अभिमान वाटत असल्याचे सुतोवाच केले.

सचिव ऋग्वेद कांडपिळे यांनी सेक्रेटरी अनाउन्समेंट केली. भावी अध्यक्ष चारुदत्त भगत यांनी सोहळा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्यांचे तसेच प्रमुख पाहुण्यांचे आणि उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. या वेळी नुतन कार्यकारिणी अध्यक्ष डॉ. जयकुमार भंडारकर, सचिव ऋग्वेद कांडपिळे, खजिनदार मधुसुदन मालपाणी, आयटी ऑफीसर तुषार तटकरी, आयपीपी व चेअरमन मुकबधिर शाळा आयपीपी कल्पेश परमार, भावी अध्यक्ष व चेअरमन फंडरेझिंग चारुदत्त भगत, अध्यक्ष नॉमीनी सारजंट अॅट आर्म्स व डायरेक्टर स्पोर्टस् निलेश पोटे, उपाध्यक्ष व चेअरमन स्पोर्टस् पीपी गुरुदेवसिंग कोहली,डायरेक्टर क्लब अॅडमिनिस्ट्रेशन विनोद गुर्मे, आरसीपीआयटी ट्रस्ट चेअरमन व चेअरमन रोटरी फाऊंडेशन पीपी अरविंद सावळेकर, डायरेक्टर मेंबरशीप पीपी डॉ. प्रमोद गांधी, डायरेक्टर सर्व्हिस प्रोजेक्ट मेडिकल डॉ. सुरेश कारंडे, डायरेक्टर सर्व्हिस प्रोजेक्ट नॉन मेडिकल माधुरी श्रीनिवास कोडूरु, डायरेक्टर सिनर्जी, चेअरमन अटेंडन्स जितेंद्र बालड, डायरेक्टर पब्लिक इमेज, ट्रस्ट सचिव पीपी प्रमोद वालेकर, डायरेक्टर न्यु जनरेशन व चेअरमन सर्व्हिस प्रोजेक्ट नॉन मेडिकल अॅड. दिपाली बोहरा, डायरेक्टर रोटरी फाऊंडेशन क्लब लर्निंग फॅसिलेटर पीपी विष्णू सी. म्हात्रे, डायरेक्टर एन्व्हायरमेंट निलम नेरकर, डायरेक्टर व्होकेशनल विजय मेढेकर, बुलेटीन संपादक शुभदा भगत, चेअरमन सोशल इव्हेन्ट संजय जैन, चेअरमन फेलोशीप संतोष अस्वले चेअरमन मेडिकल प्रोजेक्ट डॉ. किशोर सोलंकी, चेअरमन ग्लोबल ग्रँट व सीएसआर पीपी प्रकाश श्रृंगारपुरे, चेअरमन लिट्रसी प्रकाश पाटील, चेअरमन मेंबर्स रिटेंशन पीपी अलीअसगर व्होरा, परमनंट इनव्हायटी आमदार प्रशांत ठाकूर आदींना समाविष्ट करण्यात आले आहे.

# कळंबोलीत ऑनलाईन खरेदीमध्ये एकाची फसवणूक

## मागविला कॅमेरा, मिळाला साबण

**पनवेल : वार्ताहर**

अॅमेझॉन अॅपवरून ६० हजार रुपये किमतीचा कॅमेरा मागविला असता तो न येता साबण, बॅटरी चार्जर व इतर वस्तू आल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रशांत लेंडवे हे सेक्टर ३, कळंबोली येथे राहत असून, त्यांनी अॅमेझॉन अॅपवरून कॅनोन एम फिफ्टी मार्क टू या कंपनीचा कॅमेरा ऑनलाइन हप्त्यावर खरेदी करण्यासाठी क्रेडिट कार्डचा वापर करून ऑर्डर दिली. ५९ हजार ९९० रुपयांचा कॅमेरा १० जुलैला डिलिव्हरी होणार असल्याचे दिसले. त्यांना अॅमेझॉन कंपनीच्या फोनवरून एकाचा फोन आला व डिलिव्हरीसाठी आला असल्याचे सांगितले. संध्याकाळी कामावरून घरी आले व चव्हाण यांच्याकडून ऑर्डरचा बॉक्स ताब्यात घेतला. त्यांनी डिलिव्हरी बॉक्स खोलत असताना व्हिडिओ रेकॉर्डिंग करून बॉक्स खोलला.

या वेळी त्यात साबण, कॅनन कंपनीची बॅटरी चार्जर, चार्जर केबल, मॅन्युअल बुक अशा वस्तू होत्या. त्यांनी अॅमेझॉनच्या ग्राहक केंद्राच्या फोनवर फोन करून तक्रार दाखल केली, मात्र तपासणी करून ऑर्डर परत मिळणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे तक्रारीचे निवारण न झाल्याने व फसवणूक झाल्याने लवंडे यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलीस करीत आहेत.





**पनवेल : स्वामी नरेंद्रचार्य महाराज व कानिफनाथ महाराज यांच्या आशीर्वादाने न्हावा सेवाकेंद्राच्या वतीने रविवारी तालुक्यातील खारकोपर येथील हनुमान मंदिरात नवीन संतसंग सुरू झाले आहे. यानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत तेथे आयोजित पूजेचे दर्शन घेतले. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद, प्रल्हादशेठ पाटील आदी उपस्थित होते.**

# सारसई माडभुवन वाडीला दरडीचा धोका

## भाजपच्या ज्ञानेश्वर घरत यांच्याकडून डोंगराची पाहणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपटा ग्रामपंचायत अंतर्गत सारसई माडभुवन या आदिवासी ठाकूर वस्तीलाही इर्शाळवाडीप्रमाणे दरडींचा धोका निर्माण झाला. त्यामुळे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी सारसई माडभुवन वाडी परिसराची पाहणी केली.

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा ग्रामपंचायत अंतर्गत सारसई माडभुवन ही आदिवासी ठाकूर वस्ती आहे. किमान शंभर कुटुंब या ठिकाणी वास्तव्य करतात. डोंगराच्या पायथ्याशीच हे गाव वसलेले आहे. मोलमजुरी करणाऱ्या या आदिवासींना रस्ता, लाईट, पाणी या समस्यांना दरवर्षी सामोरे जावे लागते. गेल्यावर्षी येथील स्थानिक माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी सतत पाठपुरावा करत वनविभागाची परवानगी घेऊन रस्ता आणि पाण्याचा प्रश्न मार्गी लावला आहे, परंतु नुकताच झालेल्या इर्शाळवाडीच्या दुर्घटनेचा धस्का येथील आदिवासी लोकांनी घेतला आहे.



या वस्ती लगत असलेल्या डोंगराला गेल्या वर्षापासून पावसाळ्यात तडे जात आहेत. डोंगर कधीही खचून ही दरड वाडीत येऊ शकते, अशी भीती ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. याचे गांभीर्य लक्ष्यात घेऊन आमदार महेश बालदी यांनी तातडीने प्रशासनाला सूचना दिल्या आहेत त्याचाच एक भाग म्हणून माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी प्रत्यक्ष डोंगरावर जाऊन डोंगराला पडलेल्या भेगांची पाहणी केली आणि ग्रामस्थांना जागृत राहण्याच्या सूचना दिल्या तसेच पनवेल तहसीलदारांना संपर्क करून तातडीने पाहणी करून पुढील उपाययोजना करण्याची विनंती केली आहे.

ज्ञानेश्वर घरत या वेळी म्हणाले की, गेल्या वर्षी सारसई माडभुवन येथील डोंगराला गेलेली तडा गेली आहे. लवकरच संबंधित प्रशासन पाहणी करणार आहे. माझी शासनाला विनंती आहे की, या वाडीतील ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याबाबत विचारविनिमय करावा.

> **आमदार महेश बालदी यांच्या आदेशानुसार आम्ही येथे पाहणी केली. या डोंगराला मोठी तडा गेली असून बरोबर त्याखाली माडभुवन वसलेले आहे. नुकसान होऊ नये म्हणून शासनाने या वाडीतील ग्रामस्थांना दिलासा द्यावा.**
>
> **- ज्ञानेश्वर घरत, माजी जि.प. सदस्य**

या वेळी त्यांच्यासोबत माजी सरपंच दत्ता पाटील, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, धर्मेंद्र भोईर, माजी ग्रामपंचायत सदस्य सुशील ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग लेंडे, माजी सदस्य बुधाजी दोरे, शनिवार उघडा, गोरख लेंडे, विजय लेंडे वाडीतील अनेक ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.



**पनवेल : भाजपच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अविनाश कोळी यांचे खोपोलीतील भाजप पदाधिकाऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या वेळी युवा नेते राहुल जाधव, भाजप खोपोली शहर चिटणीस गोपाळ बावस्कर, वैद्यकीय सेलचे सहसंयोजक विकास खुरपडे, शक्तीकेंद्र प्रमुख संजय म्हात्रे आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# अतिवृष्टीने हाहाकार

गेल्या काही दिवसांपासून पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रात दाणादाण उडाली आहे. सततच्या पावसाने चांदा ते बांदा हाहाकार उडाला असून अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे. रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडीत दरड कोसळून अनेकांचा मृत्यू झाला, तर राज्यात विविध भागांत पूरपरिस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर वित्त हानी झाली आहे.

**जून महिन्यात 'येरे येरे पावसा' म्हणणाऱ्या लोकांवर पुढच्या एकाच महिन्यात आता बस्स् म्हणण्याची वेळ आली आहे. राज्यात काही भाग वगळता तुफान पाऊस पडला आहे. यंदा मान्सून लांबल्याने बळीराजासह नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले होते. पावसाळ्याला ज्या जून महिन्यात सुरुवात होते त्या वेळी सारे जण वरुणराजाची चातकासारखी वाट पाहत होते. त्यातच प्रचंड उकाडा होत असल्याने अस्वस्थ व्हायला होत होते. दुपारी तर घराबाहेर पडणे कठीण होऊन बसले होते. जून महिना कोरडा गेला. त्यामुळे सर्वांचेच डोळे आकाशाकडे लागले असताना जुलैच्या पंधरवड्यानंतर मुसळधार पाऊस पडू लागला. सरत्या आठवड्यातील बुधवारपासून तर 'कोसळधार' सुरू होती. त्यामुळे अनेक भागांत दाणादाण उडाली. याचा सर्वाधिक फटका कोकणाला बसला. कोकणात पर्जन्यवृष्टी झाल्याने नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहू लागले. परिणामी पूरपरिस्थिती निर्माण झाली. घरे, रस्ते, शेती सर्वत्र पाणीच पाणी झाले. रायगड जिल्हा जलमय होऊन वाताहत झाली. नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरून मोठे नुकसान झाले आहे. धुवांधार पावसात खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीत दरड कोसळून माणसांसह घरे ढिगाऱ्याखाली गाडली गेली. दुर्घटनेनंतर त्या ठिकाणी युद्धपातळीवर शोध व बचावकार्य सुरू आहे, तर दुसरीकडे मदतीचा ओघ सुरू आहे, मात्र या नैसर्गिक आपत्तीमध्ये कित्येकांचा मृत्यू झाला असून काही जण बचावले आहेत. वाचलेल्यांचे सुयोग्य पुनर्वसन करणे हे आता महत्त्वाचे ठरणार आहे. त्या दृष्टीने शासन-प्रशासन कार्यरत आहेत. कोकणानंतर विर्दभ, मराठवाड्यात पावसाने आपला मोर्चा वळविला. यवतमाळ, नांदेड, अकोला, अमरावती, गडचिरोलीत जबरदस्त पडलेल्या पावसाने मोठी हानी केली आहे. दुर्दैवाने काही जण वाहून गेले. यवतमाळमध्ये पुराच्या पाण्यात अडकलेल्यांना एनडीआरएफच्या पथकांनी स्थानिकांच्या मदतीने वाचविले. एकीकडे राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाच्या सरींवर सरी बरसत असताना मराठवाड्यातील नांदेड वगळता इतर भागांत विशेष पाऊस नव्हता. विदर्भात नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यात पावसाने उघडीप दिली. उत्तर महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात पावसाची विश्रांती आहे. पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्याच्या काही भागांत हवामान कोरडे होते. पावसाअभावी काही ठिकाणी परिस्थिती गंभीर बनली असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याचे संकट उभे राहिले आहे. असे विषम चित्र पहावयास मिळत आहे. कोकणात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. दोन महिन्यांत जलाशये भरल्यानंतर बाकीचे पाणी समुद्राला जाऊन मिळते, जे फुकटच जाते. उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा बसत असतात. पावसाळ्यात मात्र उलटेच घडते. हे उरलेले पाणी दुष्काळग्रस्त भागाकडे वळविणे गरजेचे आहे. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लक्ष वेधले आहे. यावर भविष्यात काम केल्यास पाण्याचा असमतोल नष्ट होऊन सर्वांना 'जीवन' मिळेल.**

# उल्हास नदी संवर्धन कर्जतकरांसाठी वरदान







**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत शहराच्या बाजूने उल्हास नदी वाहते. या नदीकडे बघून मन प्रसन्न होत असते, परंतु पावसाळा आला की नदीच्या काठावर राहणाऱ्या रहिवाशांच्या पोटात दररोज रात्री गोळा येतो कारण अतिवृष्टीमुळे ही नदी उलटून तिचे पाणी कधीही कर्जत शहरात घुसत असे. त्यामुळे नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या रहिवाशांना रात्र रात्र जागून काढावी लागत असे. यावर उल्हास नदीची गेली दोन वर्षे गाळ काढून साफ सफाई करणे हे वरदानच ठरले. याचे श्रेय आमदार महेंद्र थोरवे यांना जाते. या उपक्रमामुळे कर्जतकरांना रात्रीची मस्त झोप लागू लागली आहे.

उल्हास नदीच्या काठावर कर्जत शहर वसलेले आहे. या भागातील भगवान टॉकीज, भगत निवास पासून संपूर्ण कोतवाल नगर मधील रहिवासी पावसाळ्यात रात्र-रात्र जागून काढत असत. दरवर्षी पावसाळ्यात नदीचे पात्र उलटून ते पाणी शहरात घुसून संपूर्ण जनजीवन विस्कळीत करीत असे. १९८९ च्या पुरात दोन-तीन जण वाहूनही गेले आहेत. त्यामुळे रात्री पाऊस सुरू झाला की, रहिवाशांच्या उरात धडकी भरत असे. याच भागात टेलिफोन एक्सचेंज असल्याने जास्त पाऊस होऊन पूर आला की, एक्सचेंजमध्ये पाणी शिरत असे आणि परिणामी संपर्कही तुटत असे. अगदी आठवडे दोन आठवडे एक्सचेंज बंद पडत असल्याने सारीच पंचाईत होत असे.

कर्जत शहरातील आमराई भागात कुलाबा लोकल बोर्ड असताना पादचारी पूल वजा बंधारा उभारण्यात आला होता. बंधारीतील पाणी सोडण्यासाठी एकच छोटासा गोलाकार दरवाजा होता व त्याला चावीची झडप होती. पावसाचा अंदाज न आल्याने नदीत खूप पाणी असल्याने ती झडप उघडणे कधी कधी शक्य होत नव्हते. तर अतिवृष्टीत झडप उघडूनसुद्धा मोठ्या प्रमाणात पाणी जात नसल्याने नेहमीच नदीचे पात्र उलटून काठावरील रहिवाशांच्या घरात पाणी शिरत असे. कित्येक वर्षे हा त्रास कर्जतकरांना सहन करावा लागला होता.

सुनील तटकरे जलसंधारण मंत्री असताना तत्कालीन आमदार सुरेश लाड यांच्या पाठपुराव्यामुळे त्यांनी नवीन बंधारा वजा पादचारी पूल आणि नदीच्या किनारी संरक्षक भिंत उभी करण्यास मंजुरी दिली आणि ते काम पूर्ण करण्यात आले. पूर्वी बांधल्या बंधाऱ्याला केवळ एकच दरवाजा होता. अचानक अतिवृष्टी झाली की हा दरवाजा उघडणेसुद्धा कठीण होऊन बसायचे. नवीन बंधाऱ्याला ३८ दरवाजे करून पाणी अडविण्यासाठी झडपा बसवण्यात आल्या. पाऊस कमी झाल्या की झडपा लावून पाणी अडविण्याचे काम होत आहे. पावसाळ्यात सर्वच्या सर्व झडपा काढून टाकल्याने पाणी झटकन निघून जात असे आणि शहरात पाणी येत नसे. त्यातूनही एक दोन वेळा पाण्याची पातळी संरक्षक भिंती वरून उलटण्याची शक्यता निर्माण झाल्याने तत्कालीन आमदार लाड यांनी नदीचा गाळ काढण्याचा उपक्रम उद्योजक भगवान भोईर यांच्या सहकार्याने हाती घेतला व नदीची साफ सफाई केली. त्यामुळे दहा - बारा वर्षे कितीही पाऊस झाला तरी नदीचे पात्र खोल झाल्याने उलटत नसे.

२०२१ च्या पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे नदीचे पात्र इतके उलटले की, संरक्षक भिंत सोडाच आयुष्यात ज्या नानामास्तर नगर मध्ये कधी पाणी आले नाही तेथील घरांमध्ये दोन - अडीच फूट पाणी आले आणि पुन्हा एकदा राहिवाश्यांच्या पोटात गोळा येऊ लागला. त्यावर काय उपाय करावा या चिंतेत सारे जण असताना आमदार महेंद्र थोरवे यांनी २०२२ च्या उन्हाळ्यात नदीचा गाळ काढून नदी संवर्धनाचे काम हाती घेतले त्यामुळे गेल्या वर्षी खूप पाऊस झाला तरी नदीचे थेंबभर पाणी उलटले नाही आणि कर्जतकरांनी निश्वास सोडला.

यावर्षी कर्जत तालुक्यात यावर्षातील सर्वाधिक २६२ मिली पाऊस काल पडला असून आजदेखील पावसाची संततधार सुरू होती. त्यामुळे उल्हास नदी दुथडी भरून वाहत असली तरी कर्जत शहरातील नागरिकांना असलेली महापूराची भीती या वेळी आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशनकडून करण्यात आलेल्या नदी खोलीकरण कामामुळे दूर झाली आहे. गतवर्षी इंदिरा नगर, बामचा मळा या भागातील नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने त्या कुटुंबांचे मोठे नुकसान झाले होते. यावर्षीचा सर्वांत मोठा महापूर आज आला असून सर्वत्र पावसाने हाहाकार माजविला असताना कर्जत शहरातील नागरिकांनी उल्हास नदीने धोक्याची पातळी ओलांडली नसल्याने सुटकेचा निःश्वास सोडला आहे. कर्जत श्रीराम पुल येथील पाण्याचा बंधारा येथे ४८ मीटर उंचीचा असून त्या ठिकाणी पाण्याची पातळी ४६ मीटरपर्यंत पोहचली होती. त्यामुळे कर्जत शहरात नागरी वस्तीत कुठेही पाणी शिरण्याची घटना घडली नाही आणि त्याचे श्रेय आमदार महेंद्र थोरवे तसेच पालिकेचे स्वीकृत नगरसेवक संकेत भासे यांना जाते. हे कटू सत्य आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# जाणून घ्या कुठे असते स्मार्टफोनची एक्सपायरी डेट



जर तुम्ही फक्त स्मार्टफोन विकत घेत असाल आणि तुम्हाला वाटत असेल की हा स्मार्टफोन कधीच खराब होणार नाही आणि नेहमीच नवीन राहील तर तो तुमचा गैरसमज आहे. आम्ही फक्त स्मार्टफोनच्या बॉडीच नव्हे तर संपूर्ण स्मार्टफोनबद्दल बोलत आहोत. वास्तविक, प्रत्येक स्मार्टफोन काही काळानंतर दोषपूर्ण होऊ लागतो, जरी हा दोष सुधारला जाऊ शकतो. सोप्या भाषेत स्मार्टफोनची एक्सपायरी डेट असते. स्मार्टफोनमध्ये वापरलेले पार्ट्स खराब होतात, त्यांच्यामुळे स्मार्टफोनदेखील खराब होतो, अशा परिस्थितीत स्मार्टफोनच्या पार्ट्सची एक्सपायरी डेट असते. यातील एक भाग म्हणजे स्मार्टफोनची बॅटरी, ही खराब झाल्यास स्मार्टफोन लगेच काम करणे थांबवतो

एक एक्सपायरी डेट आहे जी तुम्ही स्वतः पाहू शकता. वास्तविक, स्मार्टफोनच्या बॅटरीमध्ये अनेक प्रकारची रसायने वापरली जातात आणि कालांतराने त्यामध्ये बदल होतात आणि ते खराब होऊ लागतात, ज्यामुळे बॅटरीची चार्ज होल्डिंग क्षमता कमी होते आणि शेवटी ती पूर्णपणे बिघडते, असे घडू शकते.

प्रत्येक स्मार्टफोनच्या बॅटरीच्या मागे किती वेळा चार्ज करता येईल हे लिहिलेले असते. खरं तर ही त्याची एक्सपायरी डेट आहे. जर सोप्या भाषेत समजले तर, जर बॅटरीच्या मागील बाजूस असे लिहिलेले असेल की ती एक हजार वेळा चार्ज केली जाऊ शकते, तर याचा अर्थ असा होतो की एक हजार किंवा त्याहून अधिक वेळा चार्ज केल्यानंतर, ही बॅटरी समस्यांना तोंड देऊ लागेल. वास्तविक, बॅटरीमध्ये वापरल्या जाणाऱ्या रसायनांचे आयुष्य निश्चित असते आणि प्रत्येक वेळी बॅटरी चार्ज केल्यावर ती खराब होत राहते आणि शेवटी ती पूर्णपणे खराब होते. जर आपण स्मार्टफोनबद्दल बोललो तर त्याची एक्सपायरी डेट त्यामध्ये वापरलेल्या बॅटरीच्या एक्सपायरी डेटवर अवलंबून असते, जरी बॅटरी बदलली तर स्मार्टफोन दीर्घकाळ वापरता येतो.

तज्ज्ञांच्या मते, कंपनीनुसार, कोणत्याही कंपनीसाठी स्मार्टफोनची शेल्फ लाइफ भारतात फक्त नऊ महिने असते. ट्रॅडिशनल नुसार, स्मार्टफोनचे शेल्फ लाइफ १८ महिने आहे.

# अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोज कुमार



**निमित्त**

हिंदी चित्रपटसृष्टीतील देशभक्तीपर चित्रपटांचे लेखक, निर्माते, दिग्दर्शक आणि प्रसिद्ध अभिनेते मनोज कुमार. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी सध्याच्या पाकिस्तानमधील खैबर पख्तूनवा उत्तर-पश्चिम सीमा प्रांतातील एबोटाबाद येथे झाला. हिंदुस्थानच्या फाळणीनंतर त्यांनी आपल्या परिवारासह दिल्ली येथे स्थलांतर केले. तिथेच त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या हिंदू कॉलेजमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांचे मूळ नाव हरिकिशन गिरीगोस्वामी. तारुण्यात असताना शबनम या चित्रपटातील दिलीप कुमार यांच्या भूमिकेचा त्यांच्या मनावर इतका प्रभाव पडला की, त्या चित्रपटातील दिलीपकुमार यांच्या मनोज ह्या नावावरून त्यांनी स्वतःचे नामकरण 'मनोज कुमार' असे केले. अभिनेता बनण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी दिल्ली सोडली आणि मुंबईत प्रवेश केला.

१९५७ मध्ये आलेल्या फॅशन या चित्रपटात २० वर्षीय मनोज कुमारांनी ८० वर्षीय वृद्ध भिकाऱ्याची भूमिका पार पाडून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. १९६० मध्ये आलेल्या कांच की गुडिया या चित्रपटामध्ये ते मुख्य भूमिकेत झळकले. त्यानंतर पिया मिलन की आस, रेशमी रुमाल, हरियाली और रास्ता, हिमालय की गोद में या चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका साकारल्या. त्यांचे आदर्श दिलीपकुमार यांच्यासोबत त्यांनी आदमी या चित्रपटात भूमिका साकारली. १९६४ सालच्या राज खोसला दिग्दर्शित वो कौन थी या संगीतमय रहस्यरंजक चित्रपटातील भूमिकेने आणि या चित्रपटाच्या व्यावसायिक यशाने मनोज कुमार यांची हिंदी चित्रपटसृष्टीत नवी ओळख निर्माण झाली.

साठचे दशक मनोजकुमार यांच्यासाठी यशस्वी ठरले. या काळात आलेल्या चित्रपटांमधून प्रेक्षकांना त्यांच्यातला एक अष्टपैलू अभिनेता पाहावयास मिळाला. हनीमून, अपना बनाके देखो, नकली नवाब, पत्थर के सनम, साजन आणिसावन की घटा या श्रृंगारिक; शादी, गृहस्थी, अपने हुवे पराए, नीलकमल आणि आदमी या सामाजिक; तर गुमनाम, अनिता आणि वो कौन थी या भयपटांनी प्रेक्षकांच्या मनावर या दशकात राज्य केले.

मनोजकुमार यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांतील गाणी हा विशेष कौतुकाचा भाग ठरला. 'मेरे देश की धरती' या गाण्याप्रमाणेच कसमे वादे प्यार वफा सब (उपकार), पूरवा सुहानी आयी रे, कोई जब तुम्हारा हृदय तोड दे, दुल्हन चली, भारत का रहनेवाला हूँ (पूरब और पश्चिम), पानी रे पानी तेरा रंग कैसा, एक प्यार का नगमा है (शोर), महंगाई मार गयी (रोटी,कपडा और मकान) या गाण्यांचा त्यात समावेश होतो. रोटी, कपडा और मकान या चित्रपटासाठी त्यांना पुन्हा एकदा सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त झाला.

मनोज कुमार हरियाणाच्या शशी गोस्वामी यांच्यासोबत विवाहबद्ध झाले. त्यांना विशाल आणि कुणाल अशी दोन मुले आहेत. पैकी विशालने संगीत क्षेत्रात तर कुणालने अभिनय क्षेत्रात आपला नशीब आजमवले. १९९५ च्या देशवासी, मैदान ए जंग या चित्रपटांनंतर त्यांनी चित्रपटांतून अभिनय करण्याचे थांबविले, तर १९९९ च्या जय हिंद या चित्रपटानंतर त्यांनी निर्मिती व दिग्दर्शनातून निवृत्ती घेतली.

मनोजकुमार यांना चित्रपटसृष्टीतील योगदानासाठी १९९२ मध्ये भारत सरकारने 'पद्मश्री' हा नागरी पुरस्कार देऊन गौरविले. तर हिंदी चित्रपटसृष्टीतील ४० वर्षांच्या कारकीर्दीसाठी १९९९ मध्ये 'फिल्मफेअर लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्काराने' त्यांना सन्मानित करण्यात आले. दादासाहेब फाळके पुरस्काराने २०१६ मध्ये त्यांना सन्मानित करण्यात आले. कृष्णधवल चित्रपटाच्या काळापासूनची मनोजकुमार यांची रूपेरी वाटचाल खूप मोठी आहे.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : दमदार पावसामुळे सर्वच ठिकाणी शेतीकामांना वेग आला आहे. भाजपचे पळस्पे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनीही वेळ काढून शिवकर येथील आपल्या शेतात सहकुटुंब भात लावणी केली.**

## आरोग्य प्रहर

# आयुर्वेदानुसार भाताचा 'हा' प्रकार सुपरफूड!



शतकानुशतके तांदूळ हा भारतीय पाककृतीचा एक महत्त्वाचा भाग म्हणून अबाधित राहिला आहे. भाताच्या शेकडो जाती आढळतात. तुम्हाला पांढऱ्या आणि ब्राऊन तांदळाची माहिती आहे, अनेकदा वजन कमी करण्यापासून ते डायबिटिजपर्यंत अनेक स्थितींमध्ये नेमका कोणता तांदूळ आरोग्यदायी ठरेल यावरून चर्चा होत असतात. यात अनेकांना माहित नसलेला पण बहुगुणी असा एक तांदळाचा प्रकार म्हणजे नवरा किंवा नजावरा तांदूळ.

**नजावरा तांदळाच्या भाताचे फायदे**

तांदळाच्या याच जातीबद्दल बोलताना, डॉ. स्वाती रामामूर्ती, हेड (संशोधन आणि विकास) हर्बी एंजेल सांगतात की, नजावरा तांदूळ हा तांदळाचा एक पारंपारिक प्रकार आहे ज्याचे मूळ केरळमध्ये आहे. पेरणीनंतर ६० दिवसांत पीक काढणीस येते. त्यामुळे याला शास्तिका शाली म्हणजेच ६० दिवसांत उगवणारा तांदूळ असेही म्हणतात. हा पॉलिश न केलेला तांदूळ असतो, जो लालसर तपकिरी रंगाचा असतो. या तांदळाला आयुर्वेदात फक्त अन्न म्हणूनच नव्हे तर औषध म्हणूनही वापरले गेले आहे. उच्च पौष्टिक मूल्यांमुळे हे पारंपारिक सुपरफूडपैकी एक मानले जाते.

चरक संहितेनुसार, नजावर भात किंवा नवरा तांदूळ हा आयुर्वेदातील सर्वोत्तम धान्यांपैकी एक मानला जातो. तांदळाची ही विविधता शरीराला त्वरित ऊर्जा आणि पोषण देते. शिवाय, रक्त, हाडे, स्नायू, पुनरुत्पादक ऊतक यांना मजबूत करून सर्व तीन दोषांचे संतुलनदेखील करते. तापातून बरे झालेल्या रुग्णांसाठी तसेच मधुमेही रुग्ण आणि गर्भवती महिलांसाठी या भाताची पेज उत्तम काम करते.

डॉ. राममूर्ती सांगतात की, या तांदळात फिनोलिक संयुगे, अँथोसायनिन्स आणि फ्लेव्होनॉइड्स असतात यामुळे या भाताचे सेवन पौष्टिक, दाहक-विरोधी, वेदनाशामकशक्ती वाढवते. आयुर्वेदानुसार, या भाताचे रोज सेवन केल्यास संधिवात, अर्धांगवायू यांसारख्या न्यूरोमस्क्युलर स्थितींवर उपचारात मदत होऊ शकते. दुसरीकडे, केरळ कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या चमूने केलेल्या अभ्यासात, स्तनाच्या कर्करोगावर उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रथिनाची काही अंशी उपस्थिती असल्याचे आढळून आले होते.

# कर्जतमध्ये दरडग्रस्त वस्तीसाठी उपाययोजना

## नगर परिषदेतर्फे बांधण्यात येणार संरक्षक भिंत

**कर्जत : प्रतिनिधी**

मुद्रे गावातील दरडग्रस्त भागाची पाहणी कर्जत तालुका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आली. दरडग्रस्त नागरिकांनी पालिकेच्या नोटिसा स्वीकारल्या नाहीत तर त्यांच्या घरांना चिकटवून ठेवा तसेच त्या घराचे पंचनामे करावेत, अशा सूचना आपत्ती कालीन व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आल्या आहेत. मुद्रे येथे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संरक्षक भिंत बांधली जाईल, त्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या वेळी तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, पालिका मुख्याधिकारी वैभव गारवे, निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत आदी उपस्थित होते. मुद्रे भागातील दरडग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन



पथक येणार असल्याने नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, माजी नगरसेवक संतोष पाटील, नगर अभियंता मनीष गायकवाड, स्वच्छ्ता निरीक्षक सुदाम म्हसे, नगर रचना प्रमुख स्वागत येलवंडे, लिपिक बापू बहिरम आदी उपस्थित होते.

त्यांनी पालिका हद्दीमधील दरडग्रस्त म्हणून नोंद असलेल्या सर्व ११५ घरांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यातील १२ घरे ही अतिधोकादायक असून त्या सर्वांना पालिकेने नोटिसा बजावल्या होत्या, मात्र काही नागरिकांनी नोटिसा स्वीकारल्या नाहीत, अशी माहिती दिली.

### पालिका करणार सर्वेक्षण

***कर्जत शहरातील जी ११५ कुटुंब दरडग्रस्त भागात आहेत, त्या सर्व घरांमध्ये राहणाऱ्यांची नावानिशी नोंद करून घेतले जाणार आहे. या भागातील जी १२ घरे अतिधोकादायक आहेत, त्या घरातील नागरिकांनी पालिकेच्या सूचनेनुसार स्थलांतरित व्हावे, अशी सूचना केली.***

पालिकेने ज्या काही घर मालकांनी नोटिसा स्वीकारल्या नाहीत त्यांच्या घरांना नोटिसा चिटकवून टाका, अशी सूचना पालिका कर्मचाऱ्यांना मुख्याधिकारी गारवे यांनी केली. नगरसेवक संकेत भासे आणि अभिषेक सुर्वे यांनीही या परिसराची पाहणी केली होती.

सार्वजनिक बांधकाम विभाग शाखा अभियंता अक्षय चौधरी यांना सदर ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्याचे प्रस्ताव तयार करण्यात यावेत, असे सूचित करण्यात आले. आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास मुद्रे भागातील नागरिकांना रॉयल गार्डन आणि अभिनव प्रशाला येथे राहण्यास जावे लागेल. तेथे पालिकेकडून भोजनाची व्यवस्था केली जाईल, असे आश्वासन मुख्यधिकारी वैभव गारवे यांनी नागरिकांना दिले आहे.

मुद्रे येथील नागरिकांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी कचेरीच्या टेकडी खाली असलेल्या घरांच्या मागे संरक्षक भिंत बांधण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यासाठी ३० जुलै रोजी होणाऱ्या जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत मंजुरी घेण्यात येईल, असे आश्वासनदेखील दिले.

# प्रियकराच्या मदतीने काढला पतीचा काटा

## कर्जत देवपाडा येथील घटना; मृतदेह पुरला

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील देवपाडा या गावात सुखाने संसार करणाऱ्या एका दाम्पत्याच्या संसारात बायकोची मती फिरली त्यामुळे तिच्या विवाहबाह्य संबंधात नवऱ्याचा अडसर होय लागला. त्यामुळे प्रियकराच्या मदतीने तिने आपल्या नवऱ्याचा थेट काटा काढल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सुरुवातीला नवरा हरवला अशी आवई उठवल्यानंतर नेरळ पोलिसांनी मात्र या घटनेतील गोम शोधून काढत या प्रकरणाचा छडा लावला आहे, तर आरोपींना अटक केली आहे.

### पत्नीला प्रेमीसह अटक

देवपाडा येथे राहणारा सचिन मुरबे (वय ३८) हा रिक्षाचालकाचे काम करीत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. काही वर्षांपूर्वी त्याचे लग्न अरुणासोबत झाले होते. अचानक सचिन दत्तु मुरबे १५ जुलैपासून बेपत्ता झाल्याची तक्रार पत्नी अरुणा सचिन मुरबे हिने नेरळ पोलीस ठाण्यात दिली. या प्रकरणामध्ये सचिन मुरबे याचा शोध लावण्याचे अनुषंगाने कोणतेही धागेदोरे पोलिसांच्या हाती नव्हते. फिर्यादी पत्नीसोबत तक्रार देण्याकरीता आलेला ऋषिकेश नामदेव तुपे हा सचिनला शिकारीकरिता जंगलात घेऊन गेला होता अशी गुप्त माहिती नेरळ पोलिसाना मिळाली. त्यामुळे पोलिसांचा ऋषिकेश तुपे याच्यावर संशय बळावला.

ऋषिकेशला पोलीस ठाण्यात बोलावून पोलिसांनी चौकशी केली. त्या वेळी त्याने त्याचे मृत व्यक्तीची पत्नी अरुणा सचिन मुरबे विवाहबाह्य प्रेमसंबंध असल्याचे सांगून त्यामध्ये सचिनचा अडथळा येत होता असे सत्य कबूल केले, तसेच त्यानेच १५ जुलै रोजी रात्री ९.३० वा. चे सुमारास आरीच्या जंगलभागात सचिन मुरबे यांस शिकारीकरीता जाण्याचा बहाणा करून नेले व ठासणीच्या बंदुकीने सचिन मुरबेला जीवे मारले.

त्यानंतर त्याचा मृतदेह जंगल भागात पुरून पुरावा नष्ट केल्याचे तपासात निष्पन्न झाले. नेरळ पोलिसांनी शनिवारी (दि. २२) गुन्हा दाखल करीत आरोपी ऋषिकेश नामदेव तुपे यास अटक केली. या गुन्ह्यात अरुणा सचिन मुरबे हिचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने तिलादेखील अटक करून न्यायालयाकडून पुढील तपासाकरीता पोलीस कस्टडी घेण्यात आलेली असून नेरळ पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# खोपोली भाजी मंडईत कचऱ्याचे साम्राज्य

## सततच्या पावसाने अस्वच्छता; दुर्गंधीने नागरिक हैराण

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील मध्यवर्ती महात्मा फुले भाजी मंडईची अवस्था भयानक बनली आहे. सततच्या पावसामुळे सर्वत्र होत असलेली प्रचंड पाणी गळती व स्वच्छतेबाबत निर्माण होत असलेली अडचण यमुळे भाजी मंडईत सर्वत्र पाणी, चिखल व कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

मागील चार दिवस सुरू असलेला मुसळधार पावसामुळे भाजी मंडईची अवस्था बिघडली आहे. पाणी गळती व मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होत असल्याने



पालिका स्वच्छता विभाग व कर्मचाऱ्यांना दैनंदिन स्वच्छता राखण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. त्यातच रविवार असल्याने मोठ्या प्रमाणावर ग्राहकांची गर्दीने येथील चिखल, अस्वच्छतेमधून वाट काढण्यासाठी नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पावसामुळे स्वच्छता ठेवण्यात अडचण निर्माण होत असली तरी, पाणीगळती रोखण्यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यासाठी नगरपालिका व येथील व्यापाऱ्यांनी एकत्रितपणे उपाययोजना करण्याची गरज आहे.

भाजी मंडईची मुख्य इमारत जीर्ण झाली असून, धोकादायक बनली आहे. दरम्यान भाजी मंडईच्या मुख्य इमारतीला लागून पत्र्याचे शेड उभारण्यात येत असून हे काम पूर्ण झाल्यावर धोकादायक इमारतीमधील दुकाने नवीन शेडखाली आणण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी सांगितले.


# चौलमध्ये आमदार महेंद्र दळवींच्या प्रयत्नातून विकासनिधी मंजूर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलमध्ये आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून भरघोस विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहे.

चौलमध्ये आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून एक कोटी ९० लाखांचा विकास निधीस मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये चौल चौकी ते रामेश्वर रस्ता तयार करणे २५ लाख, डांबरीकरण करणे १५ लाख, कालिकामाता मंदिर ते पाटील आळी रस्ता तयार करणे १५ लाख, जान्हवी तलाव ते राजनाईक तिवठा रस्ता तयार करणे १५ लाख, गायचौळे ते फणसापूर रस्ता तयार करणे ३० लाख, चौकी ते रामेश्वर रस्ता कॉँक्रिटीकरण करणे २० लाख, चौल बेलाई अंतर्गत मळेकर आळी ते दौलत आळी अंतर्गत रस्ता कॉँक्रिटीकरण करणे १५ लाख, बेलाई अंतर्गत काळभैरव मंदिर ते पाटील आळीपर्यंतचा रस्ता कॉँक्रिटीकरण १५ लाख, जान्हवी तलाव संरक्षक भिंत २० लाख, आगरआळी येथे पादचारी पूल बांधणे २० लाख आदी विकासकामांचा समावेश आहे.

# सुधागडातील वावळोलीत मातीचा ढिगारा खाली



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील वावळोली गावात शनिवारी (दि. २२) दरड कोसळली. सुदैवाने येथे कोणतीही आर्थिक व जीवितहानी झाली नाही. भविष्यात याठिकाणी मोठी दुर्घटना घडू नये यासाठी शासनाने योग्य उपाययोजना करण्याची मागणी रविवारी (दि. २२) येथील उपसरपंच शरद किंजावडे, ग्रामपंचायत सदस्य संजय फाळे व ग्रामस्थांनी केली.

वावळोली गावाच्या उत्तर दिशेला लागून असलेल्या डोंगराची दरड कोसळली आहे. या ठिकाणी काही अंतरावरच ग्रामस्थांची घरे आहेत. या घरांपर्यंत माती आली होती. यामुळे घरातील मंडळी व ग्रामस्थ घाबरले आहेत. माध्यमांना माहिती देतांना शिरीष सकपाळ, पोलीस पाटील सुधीर महाले, गणेश महाले, दिनेश महाले, रघुनाथ वालेकर व ईश्वर हिलम आदी उपस्थित होते.

**त्वरित ग्रामस्थ व पोलीस पाटील यांच्यासह दरडग्रस्त व डोंगर भागाची पाहणी केली. भविष्यात या ठिकाणी कोणतीही आपत्ती ओढवून जीवित व वित्तहानी होऊ नये यासाठी शासनाच्या माध्यमातून उपाययोजना करण्यात याव्यात व संभाव्य धोका टाळण्यात यावा.**

**शरद किंजावडे,**
**उपसरपंच, सिद्धेश्वर**

**गावावर दरड कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने या बाबीची गंभीर दखल घेऊन लागलीच योग्य उपाय करावेत व संभाव्य धोका टाळावा.**

**-संजय फाळे,**
**ग्रामस्थ वावळोली**

# उल्हास नदी स्वच्छतेमुळे कर्जत शहर सुरक्षित

**कर्जत : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे कर्जत शहरातून जाणाऱ्या उल्हास नदीमुळे शहराला व आजूबाजूच्या परिसराला पुराच्या पाण्याचा फटका बसत असे व मोठ्या प्रमाणात वित्तहानी होत असे हे ओळखून आमदार महेंद्र थोरवे यांनी उल्हास नदी वेळीच साफ केल्याने कर्जत शहर या वर्षी सुरक्षित राहिले आहे.

उल्हास नदीच्या पाण्याची पातळी वाढली आणि पाणी कर्जत शहर व परिसरात घुसले मोठे नुकसान होत असे त्यांच्या सुरक्षिततेची वेळीच ठोस उपाययोजना केल्यास पुराच्या पाण्याचा संभाव्य धोका होणार नाही, हे ओळखून कर्जत-खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी उल्हास नदी संवर्धन या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातून जाणाऱ्या उल्हास नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढवून झाडी झुडपे, कचरा, माती, दगडगोटे काढून व नदीचे कोपरे व्यवस्थित बनविले होते. त्यामुळे यावर्षी अतिवृष्टी होऊनही पूर सदृश्य परिस्थिती दिसली नाही.

शहरातील उल्हास नदीशेजारील भगवान टॉकीज, कोतवाल नगर, आमराई, गणेश घाट, बामचा मळा, दहीवली परिसर, मुद्रे आदी परिसर आज नदी सुरळीत केल्याने सुरक्षित राहिल्याने कुठलीच मनुष्यहानी व वित्तहानी झाली नाही. यामुळे आमदार महेंद्र थोरवे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे -सतीश दरेकर

**कर्जत : प्रतिनिधी**

पूर्वीचे शिक्षण व आत्ताचे यात फरक आहे, परंतु जीवनामध्ये कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सतीश दरेकर यांनी येथे व्यक्त केले.

रायगड जिल्हा कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या वतीने कर्जत येथील रॉयल गार्डन सभागृहात विद्यार्थी गुणगौरव व करिअर मार्गदर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र प्रदेश कुंभार समाज सामाजिक संस्था अध्यक्ष सतीश दरेकर यांच्या हस्ते संत गोरा कुंभार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन झाले.

समारंभास गजानन चौलकर, रसिका खेडेकर, राजेंद्र मांगरूळकर, मीनाताई चौलकर, दिगंबर इंगळे, जिल्हाध्यक्ष अनंत महाडकर, शरद वाडेकर, शरद कुंभार, अक्षता सोनावळे, रमेश कुंभार, प्रवीण कुंभार, नंदकुमार पालवणकर, दिलीप साळवी, मधुकर कुंभार, प्रतिभा वाडेकर, रामदास साळवी



आदी उपस्थित होते. तालुकाध्यक्ष रतन कुंभार यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

स्पर्धेच्या युगात यूपीएससी एमपीएससी परीक्षा विविध तज्ञांना आमंत्रित करून परिसंवाद, कार्यशाळा आदी प्रोत्साहनपर उपक्रम राबवायची आपण तयारी केली आहे.

आपल्या समाजाची मुले-मुली परदेशातही शिक्षणासाठी गेली पाहिजेत, मात्र पुन्हा ही उच्चशिक्षित मुले आपल्या देशात आली पाहिजेत.

महिला अधिवेशन घेतल्यास सर्वतोपरी सहकार्य करू, असे सांगून सतीश दरेकर म्हणाले की, यूपीएससी, एमपीएससी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे येथे अर्धा एकर जागा घेऊन मार्गदर्शन करण्यासाठी प्रयत्नशील आहे. पूर्वी शाडू मातीच्या मूर्ती असायच्या. त्याची जागा आता पीओपीने घेतली आहे.

या मूर्ती बनविण्यावर बंदी येणार आहे. ती कधी ना कधी येईल. त्यावर पीओपीसारखी टणक आणि अर्ध्या तासात पाण्यात विरघणारी माती हा पर्याय काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. येत्या काही महिन्यांत तो यशस्वी होईल.

महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या रसिका खेडेकर, शरद वाडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तर व्याख्याते दिगंबर इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांनी २२व्या कमवायला शिकले पाहिजे तसेच २५ वर्षांपर्यंत ज्ञानार्जन केले पाहिजे, असे सांगितले.

यानंतर विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. सूत्रसंचालन शरद कुंभार यांनी केले, तर आभार दिलीप साळवी यांनी मानले. या वेळी विष्णू चौलकर, राजेंद्र साळवी, रितेश पनवेलकर, राजेश शिर्के, योगेश कुंभार, विमल वाजेकर, गीता कुंभार, पद्मा कुंभार आदींसह विद्यार्थी व समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गांधारपालेत नांगरणी करणाऱ्या बैलाला विजेचा शॉक

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात गेली आठवडाभरात विजेचा शॉक बसून दोन जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. गांधारपाले गावात रविवारी (दि. २३) नांगरणी करणाऱ्या एका बैलाला शॉक बसला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. काही दिवसांपूर्वी पाचाडमध्ये रस्त्यावर पडलेल्या विजेच्या तारेचा शॉक बसून एका दुभत्या म्हैशीचा मृत्यू झाला आहे. दोन्ही घटनांचा शासकीय पंचनामा झाला असला तरी महावितरणच्या भोंगळ कारभाराचा शेतकऱ्यांना नाहक फटका बसत आहे.

### आठवड्यात दोन जनावरे दगावल्याच्या घटना

तालुक्यात गांधारपाले गावात रविवारी सकाळी शेतात नांगरणी करण्यास नेलेल्या एका बैलाला विजेच्या पोलजवळ शॉक बसून बैलाचा जागीच मृत्यू झाला आहे.

गेली आठवडाभर तालुक्यात जोरदार पाऊस असल्याने लावणीच्या कामांना वेग आला आहे. यामुळे गांधारपाले येथील अजित लेले हे शेतात भाताची लावणी करण्यास गेले होते. बैलांना शेतात नेले असता शेतात असलेल्या पोलजवळ एक बैल गेला त्याठिकाणी त्याला शॉक बसला. ही घटना शेतकरी अजित लेले यांच्या लक्षात येताच, त्यांनी शेतातून पळ काढल्याने ते वाचले. याबाबत महावितरणला कळविल्याची माहिती सरपंच नामदेव पवार यांनी सांगितले.

अशाच प्रकारे पाचाड येथील बाबू नथू औकीरकर यांची जनावरे रस्त्याने जात असताना रस्त्यात पडलेल्या विजेच्या तारेला या पाळीव जनावरांचा स्पर्श झाला यामध्ये एका दुभत्या म्हैसीचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी घडली. याबाबत स्थानिक महसूल विभागाने झालेल्या नुकसानीचा पंचनामा केला आहे. शेतकरी बाबू नथू औकीरकर यांनी वर्षभरापुर्वीच ही म्हैस विकत आणली



होती, अशी माहिती मोतीराम औकीरकर यांनी दिली. दुभती म्हैस गेल्याने या शेतकऱ्याचेही महावितरणच्या चुकीमुळे नुकसान झाले आहे.

**CITIZENS' HIGH SCHOOL AND JUNIOR COLLEGE**
**( Managed by Citizens' Education Society Uran.)**

INVITES TO APPLY FOR THE FOLLOWING PROFILES.

1. M.A B.ED.( ENGLISH)
2. H.SC D.ED
3. M.COM. B.ED ( ACCOUNTS)
4. LAB ATTENDANT
5. COMPUTER TEACHER
6. OFFICE ACCOUNTANT

Interested candidates may submit their resume with necessary documents in person by to the office of Citizens' high school and junior college.

Bazar peth ,near Uran police station.Dr. Ambekar road Uran.
Please email a copy to contact@mycitizen.in

# विजेच्या समस्येने घणसोलीकर हैराण

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली नोडमधील सेक्टर २१ ही अतिशय जलदगतीने विकसित होणारे सेक्टर आहे, मात्र आधुनिकतेचा साज चढणाऱ्या या विभागाला कायम पाण्याच्या व विजेच्या समस्येने ग्रासलेले आहे. काही इमारतीत अद्यापही टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असताना; आता विजेच्या समस्येने डोके वर काढले आहे. त्यामुळे गावठाण भगासोबत नव्याने विकसित होणारा शहरी भागदेखील त्यात भरडून निघत आहे. याबाबत घणसोली वेल्फेअर फाउंडेशनने आमदार रमेश पाटील व महावितरणकडे तक्रार करत विजेची समस्या सोडवण्याची मागणी केली आहे.



या विभागात विजेच्या समस्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. वारंवार लाइट जाणे (वीजपुरवठा खंडित होणे) मुख्य केबल नादुरुस्त होणे, जागोजागी विजेचा स्फोट होणे, बऱ्याच ठिकाणी डी. पी. नादुरुस्त असणे त्यामुळे या भागातील लोकांचे नुकसान होऊन विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे लोकांची गैरसोय होत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून सेक्टर २१ मध्ये काही गोष्टींची पूर्तता व्हावी त्यामुळे होणार त्रास कमी होईल, असे फाऊंडेशनने पत्रात म्हंटले आहे. सेक्टर २१ मध्ये नियोजित व विकसित बांधकामे व भविष्यात वाढत जाणारी लोकसंख्या पाहता योग्य त्या क्षमतेच्या तीन ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था तीन विभागात करावी. प्लॉट नो. ७७ – सिडको नियोजित भूखंड म. रा. वी. वी. कंपनी करिता राखीव असून या भूखंडचे सिडको करून हस्तांतरित करुन घ्यावे व त्या भूखंडावरती ट्रान्सफॉर्मचे नियोजन करून योग्य क्षमतेचा मेगावॅटचे ट्रान्सफॉर्म उपलब्ध करावा. सेक्टर २१ला स्वतंत्र मुख्य वीजपुरवठा वाहिनी उपलब्ध करून ती भूमिगत करावी. प्लॉट क्रं. १५२च्या समोर मोकळ्या जागेवरती दूसरा ट्रान्सफॉर्म उपलब्ध करून क्रमांक १०९ ते १५४ त्या भागातील वीजपुरवठा त्या ट्रान्सफॉर्म वरती शिफ्ट (हलविण्यात यावा) करावा. प्लॉट क्रमांक १ ते ६६ या भागाकरिता प्लॉट क्रमांक ५६ अ हा सिडको नियोजित राखीव भूखंड म. रा. वि. वि. कंपनीकरिता असून राखीव भूखंडावरती म. रा. वि. वि. कंपनीने बांधकाम केले असून उर्वरित जागेत तिसऱ्या ट्रान्सफॉर्मची व्यवस्था करावी.

### ‘सिडको व पालिकेने दखल घेणे गरजेचे’

**घणसोली हा सिडकोकडे नोड होता. तो पालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे, मात्र या विभागात पाण्यासोबत विजेच्या समस्या कायम आहेत. अद्याप या भागात मोठमोठे टॉवर्स उभे राहत आहेत. आम्हीदेखील कोट्यवधी रूपये खर्चून येथे घरे घेतली आहेत. यापुढे नवी मुंबईतील या भागात नागरिक राहण्यास येणार आहेत; असे असताना येथे विज समस्या कायम आहे. वीजपुरवठा करणे महावितरणचे काम असेल तरी नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सिडको व पालिकेनेदेखील प्रयत्न करणे आवश्यक आहे. तर घणसोलीकरांच्या समस्या तातडीने सुटतील, असे घणसोली वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष राजेश सावंत व सेक्रेटरी नितीन एलभर यांनी सांगितले.**

प्लॉट क्रमांक १०४, १२९ १३०, १३१, १३२ या परिसरातील वीजपुरवठा गणेश टॉवरच्या समोरील ट्रान्सफॉर्मवरती शिफ्ट करावा व त्या ट्रान्सफॉर्मवरची कॅपेसिटि (क्षमता) वाढवावी. प्लॉट क्रमांक १ ते ६६ या भागातील जमीनिखालून गेलेली केबल आपल्या अभियंता मार्फत निरीक्षण करून तिची दुरुस्ती करावी.

प्लॉट क्रमांक ६६, ५५, ५६ आणि ६५ या भागातील मुख्य वहिनी चेक करण्यात यावी. सेक्टर २१ मधील काही भागात डी. पी. चे दरवाजे उघडे आहेत. सध्या पावसाळ्यात शॉक बसण्याची शक्यता आहे. विभागातील तसेच तळवली गाव, नौसील नाका, घणसोली गाव सेक्टर २२, २३, २४, २५ या भागातील समस्या पाहता त्या समस्या सोडवण्यासाठी या भागात म. रा. वी. वी. कंपनीचे अभियांत्रिक अधिकाऱ्यांसह कायमस्वरूपी कार्यालय उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी फाउंडेशनने केली आहे.

# पक्ष संघटन अधिक मजबूत करणार –आ. संदीप नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

सर्वांच्या सोबत आणि सर्वांच्या समन्वयातून पक्ष संघटनेचे काम करणार आहे, असे मत नवी मुंबई जिल्हा भारतीय जनता पक्षाचे नवनियुक्त जिल्हा अध्यक्ष ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रथम आमदार संदीप नाईक यांनी व्यक्त केले.



अतिशय अभ्यासू, संघटन कुशल आणि कार्यकुशल युवानेतृत्व म्हणून संदीप नाईक यांच्याकडे पाहिले जाते. नवी मुंबई महापालिकेत स्थायी समितीचे सभापती म्हणून काम करत असताना त्यांनी या शहराच्या विकासाला चालना दिली. भारतीय जनता पक्षाने दिलेले प्रत्येक कार्यक्रम आणि उपक्रम अतिशय प्रभावीपणे राबवले. सर्वसामान्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रसंगी आंदोलनात्मक, आक्रमक पवित्रादेखील घेतला आहे. जिल्हाध्यक्ष संदीप नाईक पक्षाकडून मला नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली याचा आनंद आहे.

आमदार गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली आगामी नवी मुंबई महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपाला सत्ता मिळवून देऊ, लोकसभा आणि विधानसभा निवडणुका मोठ्या मताधिक्याने जिंकू. यासाठी सर्वांच्या सोबत आणि सर्वांच्या समन्वयातून पक्ष संघटनेचे काम करणार आहे. पक्षातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना न्याय देण्याबरोबरच पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

जिल्हाध्यक्षपदी मला संधी दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि पक्ष नेतृत्वाचे आभार मानतो, असे संदीप नाईक म्हणाले.

# आरटीई प्रतीक्षा यादीसंदर्भात आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईत आरटीईच्या प्रलंबित (प्रतीक्षा) यादीतील केवळ ११७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे शिल्लक आहे. या विद्यार्थ्यांच्या पालकांनी लवकरात लवकर कागदपत्र पडताळणीसाठी सादर करून त्यांच्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षण अधिकारी अरुणा यादव यांनी केले आहे.

आरटीई अंतर्गत शहरातील ९८ शाळांमध्ये पहिल्या लॉटरीत प्रतिक्षा यादीच्या दुसऱ्या टप्प्यापर्यंत दोन सहस्त्र ५५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता प्रतिक्षा यादीतील टप्पा क्र. ३ मधील प्रवेश प्रक्रिये १९ जुलैपासून चालु झाली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये दरवर्षीप्रमाणे खाजगी विनाअनुदानित शाळेत एकूण पटाच्या २५ टक्के विद्यार्थांना मोफत प्रवेश दिला जातो. त्यानुसार आर.टी.ई. अंतर्गत प्रवेशासाठी ३२ हजार ६१२ अर्ज आले होते. त्यापैकी दोन हजार १७२ मुलांना पहिल्या यादीत प्रवेश देण्यास पात्र झाले; मात्र पडताळणी समितीकडे दुसऱ्या प्रतिक्षा यादीपर्यंत दोन हजार ५५ विद्यार्थ्यांचे कागदपत्रे पडताळण्यासाठी आले. त्यांचे प्रवेश अंतिम करण्यात आले. उर्वरित प्रतिक्षा यादीतील ११७ पाल्यांना एसएमएस पाठवून त्यांच्या मुलांचे कागदपत्रे पडताळण्यासाठी २८ जुलै पर्यंत सादर करून पालकांनी त्यांच्या मुलांचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांनी केले आहे.

दरम्यान, पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता आरटीई पोर्टल वरील अर्जाची स्थिती त्यांच्या बालकाचा अर्ज क्र. टाकून अर्जाची स्थिती पहावी. प्रतिक्षा यादी टप्पा क्र. ३ मधील बालकाच्या पालकांनी त्यांच्या लॉगीनमधून अॅलोटमेंट पत्राची प्रिंट काढावी. हे अलोटमेंट पत्र आणि आवश्यक कागदपत्रे घेऊन जवळील पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून २८ जुलैपर्यंत कागदपत्रांची पडताळणी करून त्यांच्या बालकांचा ऑनलाईन प्रवेश निश्चित करावा. प्रवेश निश्चित झाल्याची पावती घेऊन शाळेमध्ये जावे आणि प्रवेश घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भाऊसाहेब कारेकर यांनी केले आहे.

# दुर्घटना घडल्यावर कार्यवाही करणार का? –पांडुरंग आमले

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर २ मधील नादुरूस्त व बंद अवस्थेत असलेल्या पथदिव्यांची तत्काळ दुरूस्ती करण्याचे संबंधितांना निर्देश देण्याची पालिका आयुक्तांकडे सातत्याने लेखी मागणी करूनही व आयुक्तांनी कारवाईसाठी फॉरवर्ड करूनही जनतेला अंधारातच ये–जा करावी लागत आहे. महिलेचा विनयभंग, मुलींची छेडछाड अथवा त्याहून भयानक घटना घडल्यावर नवी मुंबई महापालिका प्रशासन समस्या निवारणासाठी कारवाई करणार का? असा संतप्त सवाल भारतीय जनता युवा मोर्चाचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना विचारला आहे.

सानपाडा सेक्टर २ मध्ये पथदिवे बंद असल्याने अंधारातच रहीवाशांना ये–जा करावी लागते. महिला व मुलींच्या बाबतीत पावसामध्ये अंधाराचा गैरफायदा घेवून अनुचित प्रकार घडण्याची भीती असल्याने पांडुरंग आमले यांनी १२ जुलै आणि १७ जुलै पालिका आयुक्तांना निवेदन देवून समस्येचे गांभीर्य निदर्शनास आणून देताना समस्येचे तत्काळ निवारण करण्याचे निर्देश दिले, परंतु कार्यवाहीच झाली नसल्याने व अजूनही अंधारच असल्याने आयुक्तांच्या आदेशाला प्रशासन केराची टोपली दाखवते असा याचा यातून अर्थ काढायचा का? असा संतप्त प्रश्न आमले यांनी विचारला आहे.

समस्येचे गांभीर्य व अंधाराचा गैरफायदा घेत समाजविघातक शक्ती महिलांबाबत, मुलींबाबत गैरप्रकार करण्याची भीती आहे. पावसाचे दिवस आहेत. पावसामध्ये दुर्घटना घडल्यास आवाजही येणार नाही. समस्या गंभीर आहे. करदात्या नागरिकांना या परिसरातून अंधारातच ये–जा करावी लागत आहे. आपण येथील पथदिवे तातडीने दुरूस्त करण्याविषयी संबंधितांना निर्देश द्यावेत, अशी आमले यांनी महापालिका आयुक्तांना कळकळीची विनंती केली आहे.

# नवी मुंबईत सेवा दिन साजरा; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपा नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नवी मुंबई भाजपच्या वतीने सर्वत्र सेवा दिवस साजरा करण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने संपूर्ण शहरभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

भाजपच्या वतीने उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा वाढदिवस सेवा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत सेवाकार्य पोहचले पाहिजे. अंत्योदयाचा हा विचार उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कृतिशीलपणे राबविण्यात आला. दिघा, ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, सानपाडा, वाशी, जुईनगर, नेरूळ, सीवूड्स, दारावे, करावे, बेलापूर सह शहरातील सर्वच प्रभाग आणि नोडमध्ये लोकहिताचे कार्यक्रम हाती घेण्यात आले होते.

फडणवीस यांच्या संकल्पनेतील रुग्ण मित्र योजनेंतर्गत बेलापूर गाव आणि करावे येथे फळ वाटप करण्यात आले. सानपाडा येथील वात्सल्य ट्रस्टमध्ये फळ वाटप झाले. वंडर्स पार्क येथे वृक्षारोपण करण्यात आले. ऐरोली येथे विनामूल्य रक्त तपासणी शिबिर भरवण्यात आले होते. तुर्भे येथे वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. प्रभाग क्रमांक ६१ मध्ये सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. शिरवणे येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर भरवण्यात आले होते. या शिबिराचा असंख्य नागरिकांनी लाभ घेतला.

यासोबतच ऐरोलीतील वृद्धाश्रमात जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. घणसोलीमध्ये फळ वाटप झाले. कोपरखैरणे मध्ये छत्री वाटप, वृक्षारोपण, फळ वाटप, गतिमंद मुलांना धान्य वाटप करण्यात आले. जुईनगरमध्ये छत्री वाटपचा कार्यक्रम पार पडला. नवी मुंबईमध्ये ५० पेक्षा अधिक सामाजिक उपक्रमांचे आयोजन पार पडले. अशा भरगच्च कार्यक्रमांमधून उपमुख्यमंत्री फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.



# ‘केबीपी’मध्ये लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट अभ्यासक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये २०२३–२४ या शैक्षणिक वर्षापासून मुंबई विद्यापीठाशी असलेला लॉजिस्टिक्स अॅन्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट हा पदवी स्तरावरचा अभ्यासक्रम सुरू केला आहे.



या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लॉजिस्टिक क्षेत्रातील विविध कंपन्याचे संचालक, व्यवस्थापक यांनी प्रोत्साहानपर मार्गदर्शन केले. सिंगापूर पोर्टचे प्रमुख मनोज गावंड यांनी उद्योगातील कुशल मनुष्यबळाचे महत्त्व आणि टंचाई विशद केली. तसेच हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना सिंगापूर पोर्ट आणि शिपिंग उद्योगात सामावून घेण्याचे आश्वासन दिले. कौशल्य विकास अकादमीचे संचालक एस.जी. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना शासकीय योजनांची माहिती दिली. जेएनपीटी कार्गो पोर्टचे अंबादास यादव यांनी कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची लॉजिस्टिक्स क्षेत्राला सातत्याने गरज असल्याचे प्रतिपादन केले.

याशिवाय कोहलिको फूड्सचे रोहित संघवी, भारती विद्यापीठाचे श्रीनिवासन, लॉजिस्टिकसचे संचालक विमलचंद्रन, विलास पांडे यांनीही उपस्थितांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या व कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. शुभदा नायक यांनी अभ्यासक्रमाचे महत्त्व व उद्योगक्षेत्रातील संधी याविषयी प्रतिपादन केले.

प्रास्ताविक कोर्सचे समन्वयक प्रा. पांडूरंग आखाडे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार समीर शेख यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# अनुराधा पौडवाल यांच्या हस्ते कर्णबधिर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

सुप्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांच्या विशेष पुढाकारातून नमुंमपा क्षेत्रातील श्रवणदोष असणाऱ्या शासकीय यू डायस पवर नोंदीत ६४ कर्णबधिर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्राचे वाटप करण्यात आले.



गिफ्टींग साउंड या अभिनव नावाने झालेल्या या उपक्रमात कर्णबधिर विद्यार्थ्यांना विनामूल्य श्रवणयंत्र उपलब्ध होऊन त्यांच्यासाठी जणू आवाजाची बंद खिडकी खुली झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस आनंद अवर्णनीय होता.

सेवाभावी वृत्तीने लोकोपयोगी समाजकार्य करणाऱ्या अनुराधा पौडवाल यांच्या सुर्योदय फाऊंडेशन या सेवाभावी काम करणाऱ्या संस्थेच्या वतीने आरसीई फाऊंडेशन या शासकीय संस्थेला करण्यात आलेल्या विनंतीनुसार त्यांच्या सीएसआर निधीतून अलिम्को या संस्थेच्या माध्यमातून ही श्रवणयंत्रे उपलब्ध करून देण्यात आली. अशाप्रकारे एक हजाराहून अधिक श्रवणयंत्रे विविध शहरांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली असून नवी मुंबईतील यू – डायस पवर नोंदीत ६४ कर्णबधिर विद्यार्थ्यांना ही श्रवणयंत्रे श्रीम. अनुराधा पौडवाल यांच्या हस्ते सेक्टर १५, वाशी येथील नमुंमपा शाळा क्र. २८ येथे वितरित करण्यात आली. या वेळी नमुंमपा शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांनी त्यांचे महापालिकेच्या वतीने स्वागत केले.

ही श्रवणयंत्रे वितरीत करण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्यांची श्रवणचाचणी घेण्यात आली होती. तसेच त्यांच्या श्रवण क्षमतेची तपासणी करून व कानाचे माप घेऊन प्रत्येक कर्णबधिर विद्यार्थ्याला त्याच्यासाठी सुयोग्य श्रवणयंत्रे तयार करून उपलब्ध करून देण्यात आली.

या वेळी सुप्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल, नमुंमपा शिक्षण अधिकारी अरुणा यादव, समावेशित शिक्षण समन्वयक अनिता मोजाड, शाळेच्या प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक जगदिश टोले व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक बाळू खटके, ईटीसी केंद्र अधिक्षक उज्वला पाटील आणि इतर शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेरूळ, वाशीमध्ये रंगली कवितेची कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या शाळा क्रमांक २८, वाशी येथे कवितेची कार्यशाळा झाली. या वेळी नेरूळ व वाशी विभागातील सर्व मराठी माध्यमांच्या शाळांमधील इयत्ता पहिलीचे वर्ग शिक्षक सहभागी झाले होते.



नवी मुंबई महापालिका शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या विशेष पुढाकाराने झालेल्या या कार्यशाळेत सिने संगीतकार अमृत पाटील नेरूळकर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या वेळी नेरूळकर यांनी स्वरबद्ध केलेल्या कवितांचा इयत्ता पहिलीच्या वर्ग शिक्षकांना परिचय करून दिला.

कविता स्वरबद्ध झाल्या की त्या अधिक काळ स्मरणात राहतात. म्हणूनच पाठ्यपुस्तकातील

## शिक्षकांनी घेतला सहभाग

कविता शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्याही अधिक काळ स्मरणात राहाव्यात याच उद्देशाने आज या कवितेच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे केंद्र समन्वयक प्रशांत म्हात्रे यांनी उपक्रमाविषयी माहिती देताना सांगितले.

कविता म्हणजे काय? याची नेमकी व्याख्या कुणालाही करता आली नसली तरी कविता हे आत्मिक समाधानाचे एक उत्तम साधन असून शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या प्रेरणेने आज शाळेत कवितेच्या कार्यशाळे सारख्या आगळ्या – वेगळ्या उपक्रमाचे आयोजन केल्याबदल मुख्याध्यापक जगदीश टोळे यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. या कवितेच्या कार्यशाळेस तालवाद्याची साथ ताल वादक रूपेश पाटील यांनी दिली.



**नवी मुंबई : भारतीय असंतोषाचे जनक, थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीदिनानिमित्त महापालिका मुख्यालयात प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.**

# ई-रिक्षाचे घोडे अडलेय कुठे?

## माथेरानकरांचा सवाल; सेवा सुरू करण्याची सर्व स्तरांतून मागणी

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान पायलट प्रकल्पानंतर माथेरानमधील ई-रिक्षांची सेवा बंद आहे. याबाबत संनियंत्रण समितीने सर्वोच्च न्यायालयात अहवाल सादर केला असून, यात ही सेवा सुरू करण्यास हरकत नसल्याचे म्हटले आहे, तसेच गेल्या आठवड्यात आलेल्या सनियंत्रण समितीच्या सदस्यांनीही रिक्षांची सेवा बंद करायला आम्ही कुठे सांगितले होते, असे विचारले आहे. अश्वपालकांची मागणीही फेटाळली आहे. मग ही सेवा सुरू करण्यास अडचण काय? असा सवाल आता माथेरानकर करीत आहेत.

संनियंत्रण समितीच्या अध्यक्षांना माथेरान नगरपरिषदेला तसे आदेश द्यावेत, अशी मागणी आता होत आहे. माथेरानमध्ये दळवळणासाठी ई-रिक्षांचा पायलट प्रकल्प राबविण्यात आला. यासाठी नगरपालिकेच्या माध्यमातून सात ई-रिक्षांची सेवा तीन महिने देण्यात आली. हा प्रयोग यशस्वी होत, ई-रिक्षा



ही माथेरानकरांची गरज असल्याचे समोर आले, मात्र सध्या ही सेवा बंद आहे.

रिक्षांचा पायलट प्रकल्प यशस्वी पूर्ण झाला असून, त्याचा सविस्तर अहवाल समितीने सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे. या अहवालात प्रदूषण नियंत्रण बोर्डानि ई-रिक्षांमुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नसल्याचा अभिप्राय दिला आहे. ई- रिक्षासारखी वाहतूक व्यवस्था ही या शहराची गरज असल्याचे स्पष्ट निष्कर्ष अहवालात देण्यात आला आहे. वसाळ्यात ई-रिक्षा नागरिकांना उपयुक्त ठरू शकते. रिक्षा संघटनेने मुख्याधिकारी वैभव गारवे यांची भेट घेऊन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांबाबत चर्चा केली व ई-रिक्षा सुरू करण्याची मागणी केली. १२ मे २०२२च्या आदेशानुसार ई-रिक्षा सुरू करण्याची मागणी श्रमिक रिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे, शैलेश भोसले व संजय भोसले यांनी केली.

**खासदारांकडूनही सूचना**

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना ई-रिक्षा सुरू करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवलोकन करून निर्णय घेण्यास सांगितले आहे.

> **ई-रिक्षा बंद करण्याचे आदेश सनियंत्रण समितीने दिलेले नाहीत. याउलट पावसात ई-रिक्षा कशा प्रकारे चालतात, हे पाहायचे आहे व ई-रिक्षाचा वापर ई-रुग्णवाहिकेसाठी करण्याचा विचार आहे. याबाबत लवकरच योग्य निर्णय घेण्यात येईल.**
> **-डेव्हिड कार्डोज,**
> **संनियंत्रण समितीचे सदस्य**

# पेण चांदेपट्टी येथील ग्रामस्थांचे स्थलांतर



**पेण : प्रतिनिधी**

राज्यात अनेक ठिकाणी दरडप्रवण क्षेत्रात असणाऱ्या गावांना धोका पाहता त्यांचे स्थलांतर करण्याचे आदेश शासनाच्या वतीने देण्यात येत आहेत. अशाच प्रकारे पेण तालुक्यातील चांदेपट्टी येथील ग्रामस्थांचे स्थलांतर करण्याच्या सूचना महसूल विभागातर्फे देण्यात आल्या. त्याची अंमलबजावणी करण्यात आली.

पेण तालुक्यातील चांदेपट्टी गावाजवळ बॉक्साईट उत्खननामुळे गेल्या १८ वर्षांपासून दरड पडण्याची टांगती तलवार असून तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी ३९ ग्रामस्थांचे तात्पुरते स्थलांतर केले आहे. त्यांना गणपतीवाडी येथील मराठा समाजभवनात ठेवण्यात आले आहे.

पेण तालुक्यातील देवळी, खरोशी, जुई-अब्बास, चांदेपट्टी, वरवणे, झापडी, शिंदोळेवाडी, धनगरवाडी, इंदिरानगर, आदिवासीवाडी यांसह खाडीकिनाऱ्यावरील नागरिकांना नायब तहसीलदारांनी प्रत्यक्ष भेट देऊन स्थलांतरित होण्याच्या सूचना दिल्या. या स्थलांतरित ग्रामस्थांकरिता नजीकच्या शाळांमध्ये व्यवस्था करण्यात आल्याची माहिती कालेकर यांनी दिली.


मागील चार दिवसांपासून धो-धो पडणाऱ्या पावसामुळे पेण तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील कांदळे, कांदळेपाडा, दुरशेत, खरोशी, तांबडशेत, सोनखार, जोहे, कळवा या गावांमध्ये ग्रामस्थांच्या घरात पाणी शिरून नुकसान झाले आहे.

# सुधागडातील वाघजाईनगर येथे दरड कोसळली; सुदैवाने जीवित हानी नाही

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

मुसळधार पावसामुळे पालीतील सरसगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या वाघजाई नगर येथे शुक्रवारी (दि. २१) दरड कोसळली. सुदैवाने कोणतीही हानी झालेली नाही. अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली सरसगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसले आहे. शिवाय किल्ल्याच्या पायथ्याजवळ लागून मोठ्या प्रमाणात लोकवस्तीसुद्धा आहे.

वाघजाई नगर येथे किल्ल्याच्या मातीचा भाग ढासळला. नगरपंचायतीमार्फत येथे पाहणी करण्यात आली आहे. येथे वाघजाई नगर, वरचा देऊळवाडा, श्रीकृष्ण नगर, बेगरआळी, उंबरवाडी, सावंत आळी, राम आळी, मधली आळी तसेच तळई व दापोडे या आदिवासी वाडी तसेच ग. बा. वडेर हायस्कूल आणि पालिवाला महाविद्यालय आहे. त्यामुळे किल्ल्यावरून दरड कोसळल्यास येथे मोठा धोका संभवतो.



> **या ठिकाणची पाहणी करण्यात आली आहे. काही नागरिकांना भक्तनिवास येथे हलविण्यात येणार आहे. शिवाय अशा धोकादायक ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितस्थळी जाण्याच्या नोटीसदेखील पाठविल्या आहेत. नागरिकांनी दक्ष व सुरक्षित राहावे.**
> **-विद्या येरूनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपंचायत पाली**

> **ही घटना घडल्यावर तेथील लोकांना लागलीच भेट दिली. प्रशासनाने अशा धोकादायक ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावी, तसेच दुर्घटना टाळण्यासाठी योग्य खबरदारी घ्यावी.**
> **-राजेश मपारा,**
> **राज्य कार्यकारिणी सदस्य, भाजप**

# पेणमधील धोकादायक इमारतींना नोटीस

**पेण : प्रतिनिधी**

पेण पालिकेच्या यादीत शहरात १० इमारती या अत्यंत धोकादायक तर २९ धोकादायक अशा एकूण ३९ धोकादायक इमारतींना धोकादायक जाहीर करून त्यांना नोटिसा बजावल्या आहेत, मात्र या गोष्टीचा कोणतेही गांभीर्य लक्षात न घेता अनेकांनी आपल्या या इमारती, सदनिका किंवा गाळे खाली केले नाहीत. त्यामुळे रहिवाशांनी पेण पालिकेच्या नोटिसींना केराची टोपली दाखवली आहे.

पेण नगरपालिकेने नगरपरिषदेचे नोंदणीकृत स्ट्रक्चरल अभियंता यांनी अहवाल सादर करून प्रमाणित केलेले तसेच शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे



यांच्याकडील थर्ड पार्टी स्ट्रक्चरल ऑडिटनुसार या इमारती शहरातील धोकादायक आणि अतिधोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार नोटिसा देण्यात आल्या होत्या, परंतु या अत्यंत धोकादायक इमारतींपैकी कोणीही या इमारती खाली केलेल्या नाहीत.

अनेक नागरिक या इमारतींमध्ये वास्तव्य करीत आहेत.

पेण शहारातील अत्यंत धोकादायक इमारती, घरे, सर्व गाळे व सदनिका यांनी नोटीस आम्ही पावसाळ्यापूर्वी बजावली होती, मात्र कोणीही तसा लेखी अहवाल सादर केला नाही. दुसऱ्यांदाही नोटीस बजावली असून या इमारतीमधील नागरिकांची बैठक घेऊन त्यांना लवकरात लवकर इमारत खाली करण्याच्या सूचना करण्यात आले आहेत, तरीदेखील या नोटिसीकडे दुर्लक्ष केल्याने जिल्हास्तरावरून आलेल्या आदेशानुसार पोलीस बंदोबस्त घेऊन आम्ही या इमारती खाली करायला लावू अशी माहिती मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी दिली आहे.

## निवडक



### नाभिक समाज कार्याध्यक्षपदी नितीन बडे

**माणगाव** : तालुका नाभिक समाजाच्या कार्याध्यक्षपदी नितीन बडे यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली आहे. शनिवारी (दि. २२) माणगाव येथे झालेल्या सभेमध्ये त्यांची निवड करण्यात आली. समाजाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे नाभिक समाज व सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### शेणाटे शाळेत शैक्षणिक साहित्यवाटप



**माणगाव** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वर्धापन दिनानिमित्त शेणाटे राजिप शाळेत शनिवारी (दि. २२) विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप व वृक्षारोपण करताना करण्यात आले. या वेळी जिल्हा सरचिटणीस विजय येलवे, उपाध्यक्ष यशवंत मोंढे, प्रसिद्धी प्रमुख अमिष भौड, प्रतिनिधी जगदीश कासे, तालुका सचिव सुनील बयकर, ज्येष्ठ मार्गदर्शक गौतम मनवर, नथुराम मुंडे, प्रवीण जाधव, राजू थिटेकर, राजू पठारे, विनोद तुपे, दादा जाधव, गणेश भोपळे, अमरसिंग वसावे, भाऊसाहेब पवार, बालाजी तोरकड उपस्थित होते.

### आर्थिक मदतीचे प्रशासनाचे आवाहन

**अलिबाग** : इर्शालवाडी दुर्घटनेतील नागरिकांना पुन्हा उभारी देण्यासाठी समाजातील सामाजिक संस्था, ट्रस्ट, फाउंडेशन, सीएसआर, दानशूर व्यक्ती यांच्याकडून आर्थिक स्वरुपात मदत करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे. ज्यांना आर्थिक स्वरुपात मदत करावयाची आहे त्यांनी जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधी (District Disaster Response Fund), स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा अलिबाग (State Bank of India, Alibag), बँक खात्याचा नंबर :-३८२२२८७२३००, IFSC Code:-SBIN०००३०८ या बँक खात्यामध्ये निधी जमा करावा.

# चौल पुष्करणीत पोहण्याची धूम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

तुडूंब भरलेल्या चौल रामेश्वर पुष्करणीत पोहण्यासाठी मोठी गर्दी होती. युवावर्गासह, बच्चे कंपनी, महिलावर्गानेही पोहण्याचा आनंद लुटला.

गेले १५ दिवस संततधार पावसाने रेवदंडा व चौल परिसरातील विहीरी, पुष्करणी, तलाव तुडूंब भरून गेली आहेत. रविवारी तुडूंब भरलेल्या चौल रामेश्वर पुष्पकरणीमध्ये तर पोहण्यासाठी सकाळी सात वाजल्यापासून गर्दीच गर्दी दिसून येत होती. ऐतिहासिक चौल रामेश्वर पुष्करणीचा आकार फार मोठा असल्याने येथे पावसाळ्यात पुष्करणीत पोहण्यासाठी खूप गर्दी असते.

अनेक बच्चे कंपनीला पोहण्याचे प्रशिक्षण पालकवर्ग देतात. ऐन पावसाचे दिवसांत पोहण्याचा आनंद ज्येष्ठ नागरिकही घेत असतात.



# पेणमध्ये गांजासह आरोपी ताब्यात

**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये गांजासारखा अमली पदार्थ विक्रीकरीता आणलेल्या व्यक्तीस पोलिसांनी अटक केली आहे.

गांजा विक्री होत असल्याची कुणकुण पेण पोलिसांना लागली असल्याने पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक अमोल म्हात्रे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नवीन वसाहत पिरडोंगरी येथील मुकेश पाटील याच्या घराच्या मागे विक्रीसाठी आणलेला चार हजारांचा २०० ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजासह आरोपीला ताब्यात घेतले आहे.

शहरात अशाप्रकारे अवैधरित्या अमली पदार्थांची विक्री होत असल्यास पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पाणी साचल्याने शेतीचे नुकसान

## शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील कर्जत एण्डकडील नेरळ ते भिवपुरी या स्थानकाच्या दरम्यान रेल्वेकडून पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नवीन मार्ग निर्माण केले आहेत, मात्र पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग आता स्थानिक शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ ठरत आहेत. पाणी वाहून नेणाऱ्या नवीन मार्गामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये पाणीच पाणी अशी स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, शेती मधील साठून रहाणारे पाणी कसे बाहेर काढायचे? या विवंचनेत शेतकरी आहेत.

मागील दोन वर्षांपूर्वी मुंबई-पुणे या मध्य रेल्वेच्या बदलापूर ते वांगणी या दरम्यान मार्गावर पावसाळ्यातील महापुराची पाणी साचल्याने लांब पल्ल्याची गाडी



थांबली होती. त्यानंतर मध्य रेल्वेकडून रेल्वेमार्गावर अनेक ठिकाणी पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग बनविले जात आहेत. मागील सहा महिन्यांत तालुक्यातून जाणाऱ्या मध्य रेल्वेचे मार्गावर नेरळ ते भिवपुरी या भागात तीन ठिकाणी पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नव्याने मार्ग बनविण्यात आले आहेत.

लहान आकाराचे साकव बनविण्यात आले असून ते साकव सध्यातरी स्थानिक शेतकऱ्याची कसोटी पाहत आहेत. त्या साकवामधून वाहून येणारे पाणी हे शेतकऱ्यांच्या शेतात साचून राहिले असून शेतकऱ्यांना त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे पीक घेता येणार नाही अशी आज त्या भागातील शेताची परिस्थिती आहे.

शेतात साचून राहिलेले पाणी बाहेर काढायचे कसे? या विवंचनेत हे शेतकरी असून जमीन नापीक सोडण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

# बँक ऑफ इंडियाकडून २५ कोटींचे कर्जवाटप

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

किसान माह म्हणून बँक ऑफ इंडियातर्फे दरवर्षी जुलै महिना साजरा केला जातो. यानिमित्त जिल्ह्याची अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया रायगड विभाग आणि साकव पेण प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने आमटेम येथे किसान दिवस नुकताच साजरा करण्यात आला. बँक ऑफ इंडियामार्फत २५ कोटी रू. चे कर्जवाटप करण्यात आले.

या वेळी बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक एम. कार्तिकेयन, महाप्रबंधक एनबीजी पश्चिम १ एस. के. रॉय, विभागीय प्रमुख मुकेश कुमार, उपविभागीय प्रमुख जॉन लोबो, जिल्हा अग्रणी प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, साकव संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. धुमाळ, सचिव अरुण शिवकर, मंजुळा ताई, आमटेम सरपंच लक्ष्मण तांबोळी, डोलवी सरपंच परशुराम मोकल तसेच माविमचे पदाधिकारी, उमेदचे पदाधिकारी, बँकेचे शाखाधिकरी, साकवचे बचत गटातील महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यकारी निर्देशक कार्तिकेयन म्हणाले की, सर्व महिलांनी बँकेत स्वतःचे खाते उघडावे आणि प्रधानमंत्री, सुरक्षा बिमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना, अटल पेन्शन योजना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. एस. के. रॉय यांनी, गेल्या वर्षी बँकने ४६ कोटी रु. चे कर्ज वाटप फक्त बचत गटांना केले होते आणि यावर्षी १०० कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे सांगितले.

मुकेशकुमार यांनी बँक ऑफ इंडिया ग्राहकांच्या बँकेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. साकव संस्थेचे सचिव अरुण शिवकर यांनी बँक ऑफ इंडिया आणि साकव संस्था यांचे जुने नाते असून आजच्या कार्यक्रमाने आणखीनच घट्ट झाल्याचे सांगितले. तसेच साकव संस्था ही महिलांच्या कर्जाच्या वसुलीसाठी निश्चितपणे बँके बरोबर राहणार असून एकही बचत गट थकीत राहणार नाही याची खात्री दिली. तसेच उरलेले बचत गटसुद्धा क्रेडिट लिंकव्दारे बँकेशी जोडणार असल्याच सांगितले.

कार्यक्रमात प्रदीप अप्सुंदे नाबार्ड आणि सागर वाडकर तालुका कृषी अधिकारी यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन बँकेच्या कृषी विभागाचे सुधिर गायकवाड यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेचे कर्मचारी, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# भाजप अल्पसंख्याक सेल रोहा तालुका उपाध्यक्षपदी जावेद दापोलकर



**नागोठणे : बातमीदार**

भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील व भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष सोपान जांबेकर यांनी जावेद दापोलकर यांची रोहा तालुका अल्पसंख्याक सेलच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

जावेद दापोलकर यांना नागोठणे भाजपच्या कार्यलयात नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी तालुका सरचिटणीस आनंद लाड, जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष रउफ कडवेकर, शिक्षण सेलचे तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या आतिश तोडकरने ऑलिम्पिक विजेत्याला केले चीत

## रवी दहियाचे आशियाई स्पर्धेत खेळण्याचे स्वप्न भंगले



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या चाचण्यांमध्ये रविवारी (दि. २३) मोठा उलटफेर पाहायला मिळाला. ५७ किलो वजनी गटात ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता दिग्गज कुस्तीपटू रवी दहियाला महाराष्ट्राच्या आतिश तोडकरने पराभूत केले. त्यामुळे दहियाचे आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळण्याचे स्वप्न भंगले आहे.

आतिशने दिल्लीच्या इंदिरा गांधी स्टेडियममध्ये अव्वल भारतीय कुस्तीपटूला हरवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. महाराष्ट्राच्या आतिश तोडकरने ५७ किलो वजनी गटात २०-८ अशी आघाडी घेत ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या रवी दहिया याचा पराभव केला. दहियाचा हा पराभव खूप मोठा अपसेट मानला जात आहे. दहिया, ज्याला त्याच्या जबरदस्त कौशल्य आणि तग धरण्याबद्दल प्रेमाने 'द मशिन' म्हटले जाते. त्याला महाराष्ट्राच्या या पठ्ठ्याने चीतपट करीत अस्मान दाखवले.

आतिश तोडकरकडून अशा प्रकारच्या प्रतिकाराची अपेक्षा नव्हती. ज्यांनी दहियाची कुस्ती पाहिली आहे त्यांना माहित आहे की दहियाकडून दोन गुण घेणेदेखील भारतीय कुस्तीपटूंसाठी मोठे अवघड काम आहे. रविवारी आतिश तोडकरने अशी काय चमकदार कामगिरी केली की त्याने थेट ऑलिम्पिक विजेत्या खेळाडूला पाणी पाजले. दर्जेदार चाली करून केवळ गुणच मिळवले नाहीत, तर खूप मोठ्या फरकाने हरवले.

उजव्या गुडघ्याला दुखापत झाल्यामुळे रवी दहियाने या वर्षीच्या कुठल्याही स्पर्धेत भाग घेतला नव्हता. विजयाच्या आशेने तो चाचणीत उतरला होता, पण पराभवाला सामोरे जावे लागले.

दहियाने टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदकावर नाव कोरले होते. २०१९च्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये त्याला कांस्यपदक मिळाले होते. २०२२च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्यात तो यशस्वी ठरला होता. आशियाई क्रीडा स्पर्धेत मात्र त्याला अद्याप पदक जिंकता आलेले नाही. या वेळीही त्याचे स्वप्न पूर्ण होणार नाही.




# रायगडच्या सहा तायक्वांदो खेळाडूंची भारतीय संघात निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नाशिक विभागीय क्रीडा संकुल येथे इंडिया तायक्वांदो आयोजित चॅम्पियन ऑफ चॅम्पियन अंतिम फेरी, कॅडेट जागतिक तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा तसेच कॅडेट व ज्युनिअर आशियाई तायक्वांदो स्पर्धा निवड चाचणीकरिता अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अटॅकर्स, गुरुकुल व वीर तायक्वांदो अकॅडमीमधील एकूण २२ खेळाडू पात्र झाले होते. या निवड चाचणीमधील विजेते खेळाडूंची भारतीय तायक्वांदो संघासाठी पात्र झाले आहेत.

गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीतील राज जाधव, ध्रुव शेट्टी व साई जाधव यांची कॅडेट सांघिक मुले, तर किरण कदम, निशीता पाडेकर व संस्कृती पाटील यांची जुनियर सांघिक मुली या गटांत प्रथम क्रमांक पटकावून २ ते ९ सप्टेंबरदरम्यान लेबनॉन येथे होणाऱ्या आशियाई तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना आंतरराष्ट्रीय खेळाडू व राष्ट्रीय प्रशिक्षक तुषार सिनलकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

या स्पर्धेत सब-जुनियर गटात स्वयम नाईक याने २३ किलोखालील गटात सुवर्णपदक पटकावले. श्रवण भोसले व श्लोक माळी यांनी अनुक्रमे २७ व २९ किलोखालील गटात कांस्यपदक मिळविले. याशिवाय जुनियर गटात प्रीती पाटणे व निहाल भोईर यांनी अनुक्रमे ५५ किलोखालील व ७८ किलोखालील गटात कांस्यपदक मिळविले. ज्युनिअर जोडी प्रकारात प्रणित टाचतोडे व समृद्धी कापसे यांनी रौप्यपदक जिंकले, तर ओमकार भोसले, राज जाधव, साई जाधव, साईराज पाटील, खंतेश वास्कर, प्रेम पाटणे यांनी सहभाग नोंदविला.

सर्व पदक विजेत्या खेळाडूंचे अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्ष अ‍ॅड. प्रज्ञा भगत, उपाध्यक्ष संजय भोईर, सचिव सचिन माळी व खजिनदार रोहित सिनलकर यांनी तसेच इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर, राज्य संघटनेचे अध्यक्ष आबा झोडगे, महासचिव संदीप ओंबासे, सीईओ गफार यांनीही अभिनंदन केले व आंतराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय तायक्वांदो संघात पात्र झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# विश्वचषकाच्या प्रोमो व्हिडीओतून पाकच्या बाबर आझमला वगळले

**कराची : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक यंदा भारतात ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणार आहे. आयसीसीने गेल्या आठवड्यातच वर्ल्डकपचा अधिकृत प्रोमो लाँच केला आहे. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला या व्हिडीओमधून वगळण्यात आले आहे. यावर माजी खेळाडू शोएब अख्तरने संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

आयसीसीने जारी केलेल्या व्हिडीओचे शीर्षक 'इट ओन्ली टेक्स वन डे' असे आहे, ज्यामध्ये क्रिकेटचे अद्भूत क्षण एकत्र दाखवण्यात आले आहेत. या व्हिडीओला बॉलीवूड सुपरस्टार शाहरूख खानने आवाज दिला आहे. ज्यात




### शोएब अख्तर संतापला

जेमिमा रॉड्रिग्स, दिनेश कार्तिक आणि शुबमन गिल यांसारख्या खेळाडूंचा समावेश आहे. त्यांच्या व्यतिरिक्त या प्रोमो व्हिडीओमध्ये इऑन मॉर्गन, जॉन्टी रोड्स, मुथय्या मुरलीधरन, २०१९च्या विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार यांसारखे क्रिकेट दिग्गजदेखील दाखवण्यात आले आहेत. विश्वचषकाच्या इतिहासातील काही संस्मरणीय क्षणही व्हिडीओमध्ये दाखवण्यात आले आहेत. या व्हिडीओमध्ये बाबर आझम दाखवण्यात आलेले नाही, तर वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीला त्यात स्थान देण्यात आले आहे.

शोएब अख्तरने बाबरला प्रोमो व्हिडीओमधून दूर ठेवल्याबद्दल आयसीसीवर भेदभाव केल्याचा आरोप केला आहे. त्याने ट्वीटमध्ये लिहिले, पाकिस्तान आणि बाबर आझमच्या महत्त्वाच्या उपस्थितीशिवाय विश्वचषकाचा प्रोमो पूर्ण होईल असे ज्याला वाटले, त्याने खरेतर स्वतःला एक विनोद म्हणून सादर केले आहे. चला मित्रांनो, आता मोठे होण्याची वेळ आली आहे.

# सचिन तेंडुलकरकडून विराट कोहलीचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दुसरा कसोटी सामना पोर्ट ऑफ स्पेन येथे खेळला जात आहे. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतीय फलंदाज विराट कोहलीने शानदार शतक झळकावले. विराटच्या कसोटी कारकिर्दीतील हे २९वे शतक आहे. या शतकानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने त्याचे कौतुक केले आहे.

भारताच्या माजी कर्णधाराने २०१८नंतरचा परदेशी भूमीवर कसोटी सामन्यातील शतकाचा दुष्काळ संपवला. खरंतर विराट कोहली दीर्घकाळ परदेशी भूमीवर कसोटी सामन्यांमध्ये शतक झळकावू शकला नव्हता, पण या सामन्यात चाहत्यांची प्रतीक्षा संपली. दरम्यान, विराट कोहलीन सचिन तेंडुलकरचा एक विक्रमही मोडला. सचिनने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे. या स्टोरीत विराट कोहलीचा फोटो दिसत आहे. त्याचबरोबर सचिन तेंडुलकरने कॅप्शनमध्ये लिहले, अजून एक दिवस, आणखी एक शतक.

# मुकेश कुमारने कसोटी पदार्पणात घेतली विकेट

**त्रिनिदाद : वृत्तसंस्था**

त्रिनिदाद येथे भारत आणि वेस्ट इंडिज संघांत कसोटी मालिकेतील दुसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यात टीम इंडियासाठी पदार्पण करणाऱ्या मुकेश कुमारने कसोटी क्रिकेटमध्ये पहिली विकेट घेतली. यानंतर त्याने आनंद व्यक्त केला.



दुसऱ्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी शनिवारी मुकेश कुमारने विरोधी संघातील नवोदित क्रिक मॅकेन्झीला इशान किशनकरवी झेलबाद करून पॅव्हेलियनमध्ये पाठवले. अशा प्रकारे मुकेशच्या नावावर कसोटीत पहिली विकेट नोंदवली गेली आहे, ज्याचा व्हिडीओ आता व्हायरल होत आहे. हे दृश्य ५२व्या षटकात पाहिला मिळाले. मुकेश कुमारने डावखुरा फलंदाज मॅकेन्झीला चेंडू टाकला अन् त्याने तो कट करण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बॅटची कड घेऊन यष्टिरक्षक इशानच्या दिशेने गेला. इशानने येथे कोणतीही चूक न करता उत्तम झेल घेत मॅकेन्झीला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. मॅकेन्झी ५७ चेंडूंत चार चौकार आणि एक षटकारासह ३२ धावा करून बाद झाला.

कसोटीत पहिली विकेट मिळताच मुकेशने आनंदाने उडी घेतली. भारतीय स्टार विराट कोहलीनेही त्याला मिठी मारून शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर संघातील इतर सदस्यांनीही त्याच्या पाठीवर थाप मारून त्याला प्रोत्साहन दिले. विशेष म्हणजे त्याने विकेट घेताच पावसाला सुरुवात झाली. जणू ते या गोलंदाजाला त्याच्या संघर्षानंतर यश मिळाल्याबद्दल अभिनंदन करीत होते. पावसामुळे सामना थांबवण्यात आला.

सामन्याबद्दल बोलायचे, तर तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत वेस्ट इंडिज संघाने ५ विकेट गमावत २२९ धावा केल्या. पहिल्या डावाच्या आधारे वेस्ट इंडिज भारतापेक्षा २०९ धावांनी मागे आहे. विंडीजकडून ॲलिक अथांजे आणि जेसन होल्डर नाबाद परतले. ॲलिक एथंजे १११ चेंडूंत ३७ धावा खेळत आहे, तर जेसन होल्डर ३९ चेंडूंत ११ धावा करून नाबाद आहे. दोन्ही खेळाडूंमध्ये सहाव्या विकेटसाठी ६५ चेंडूंत २१ धावांची भागीदारी झाली.



### देशांतर्गत चमकदार कामगिरी

मुकेश कुमार हा बिहारच्या गोपालगंजचा रहिवासी आहे. आयपीएल २०२३मध्ये त्याने दिल्ली कॅपिटल्ससाठी सात विकेट घेतल्या. याशिवाय देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याची कामगिरी उत्कृष्ट होती. त्यामुळे एका साध्या कुटुंबातून आणि छोट्या शहरातून आलेल्या मुकेशने टीम इंडियाचा प्रवास केला. अनफिट शार्दुल ठाकूरच्या जागी त्याचा या सामन्यात समावेश करण्यात आला आहे.

# 'आकड्यांपेक्षा संघाच्या विजयातील योगदान महत्त्वाचे'

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय फलंदाज विराट कोहलीने वेस्ट इंडिजविरुद्ध शतक झळकावले. त्याच्या कसोटी कारकिर्दीतील हे ७६वे शतक होते. तब्बल पाच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर कोहलीने परदेशी भूमीवर शतक झळकावले. जवळपास ५५ महिन्यांची प्रतीक्षा शुक्रवारी संपली. या शतकानंतर विराटने टीकाकारांना सडेतोड उत्तर दिले.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर विराटने बीसीसीआयने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये म्हटले की, मला फक्त



संघासाठी योगदान द्यायचे आहे. जर मी ५० धावा केल्या असत्या, तर माझे शतक हुकले असते आणि जर मी १२० धावा केल्या असत्या, तर माझे द्विशतक शतक हुकले असते. अशा परिस्थितीत हे आकडे आणि टप्पे माझ्यासाठी फारसे महत्त्वाचे नाहीत. संघाच्या विजयात तुम्ही कसे योगदान देता हे अधिक महत्त्वाचे आहे.

पाच वर्षांनंतर मायदेशाबाहेर शतक ठोकण्याच्या प्रश्नावर विराट म्हणाला, या फक्त इतरांशी बोलण्याच्या गोष्टी आहेत. मी घरापासून दूर १५ शतके झळकावली आहेत आणि हा काही वाईट रेकॉर्ड नाही, पण मोठी गोष्ट म्हणजे प्रत्येक वेळी मी माझे सर्वोत्तम दिले आहे. आम्ही मायदेशाबाहेर दूर ३० सामनेही खेळलो नाही आणि या काळात मी अनेक वेळा ५०पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

विराट पुढे म्हणाला, माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे फिटनेस, ज्यामुळे मला सतत चांगले बनण्यास मदत होते. देशासाठी ५०० सामने खेळणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. मी माझ्या मेहनतीने हे सर्व साध्य करू शकलो. इथपर्यंत पोहचण्याचा विचार कधीच केला नव्हता.

# नवी मुंबई मनपा शाळा संघाला उपविजेतेपद

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि नवी मुंबई महापालिका क्रीडा विभागाच्या वतीने सुरू झालेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत महापालिका शाळा क्र. ३६, कोपरखैरणे गावच्या १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने अंतिम फेरी गाठली आणि उपविजेतेपद पटकाविले

### सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा

अंतिम सामन्यात ख्राईस्ट अकॅडमी संघाविरोधात पराभव स्वीकारावा लागला तरी यापूर्वी कोणताही अनुभव नसताना पहिल्यांदाच या स्पर्धेत सहभागी होत अनेक शाळांच्या मातब्बर संघांवर मात करीत कोपरखैरणे शाळेतील मुलींनी संपादन केलेले हे यश लक्षवेधी आहे. या संघात राबिया शेख, समृद्धी सोनावणे, ऋतुजा संकपाळ, किरण सूर्यवंशी, पूजा जाधव, प्रतीक्षा शिराळे, पूर्वा नवघणे, सोनाली कांबळे, सिद्धी लोहार, धनश्री महाजन, आचल ताजणे, तनुजा धुमाळ, श्वेता कंक, सेजल कंक, जगदेवी चिन्नाराठोड, करिश्मा चव्हाण, श्रावणी आगळे, समीक्षा रेणुसे, सरला झनकर यांचा समावेश होता.

या अभिमानास्पद कामगिरीबद्दल महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी संपूर्ण संघाचे व त्यांच्या प्रशिक्षक, शिक्षकांचे कौतुक केले आहे.

*क्राईस्ट अकॅडमीच्या संघाने अंतिम सामन्यात ५-० गोलने सामना जिंकला व ते या गटाचे विजेते ठरले. तथापि, चर्चा होत राहिली ती पहिल्यांदाच स्पर्धेत खेळूनही चार नामांकित शाळांचा पराभव करीत अंतिम सामन्यापर्यंत मजल मारलेल्या नमुंमपा संघाची.*









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com